नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५२ * अंक १३९ * * अकोला * शनिवार, दिनांक २२ नोव्हेंबर २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त


## एकाच कुटुंबातील ४ जणांचा घरातच मृत्यू

■ **वृत्तसंस्था, अहमदाबाद, दि. २१ :**
गुजरातमधील गोध्रा शहरात विषारी धुरामुळे गुदमरून शुक्रवारी सकाळी एकाच कुटुंबातील चार जणांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये कमलभाई दोशी (५०), त्यांची पत्नी देवलाबेन (४५), त्यांचा मोठा मुलगा देव (२४) आणि त्यांचा धाकटा मुलगा राज (२२) यांचा समावेश आहे.

देव दोशीची त्या दिवशी साखरपुड्याची तयारी सुरू होती; त्या दिवशी कुटुंब वापीला जाणार होते आणि गुरुवारी रात्री उशिरापर्यंत ते तयारीत व्यस्त होते. रात्री सोफ्याला शॉर्ट सर्किट किंवा इतर कारणामुळे आग लागली. घर सर्व बाजूंनी काचेने बंद होते, त्यामुळे आगीतून निघणारा विषारी धूर बाहेर पडू शकला नाही आणि घर पूर्णपणे भरले.

अग्राग्रलेख

## खरीखरी..

# सावरकर देशभक्तच !

राहुल गांधी यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या विषयी काही विधाने केली होती. ही विधाने अत्यंत अपमानजनक आहेत म्हणून त्याबाबतचा खटला नाशिक मधील न्यायालयात सुरू होता. तो खटलाच आज रद्द करण्यात आलेला आहे. मात्र या निमित्ताने दोन्ही गोष्टींबाबत चर्चा व्हायला हवी. राहुल गांधी जे जे बोलले त्या त्या सर्व विधानांचे पुरावे त्यांच्याकडे होते यात अजिबात वाद नाही. कारण राहुल गांधी यांनी आजपर्यंत ज्या ज्या विषयांमध्ये हात घातला आहे त्या प्रत्येकाचे पुरावे असल्याशिवाय ते बोलत नाहीत. त्यामुळेच राहुल गांधी यांच्या व्यवहाराबद्दल कोणीही त्यांच्याकडे बोट दाखवू शकत नाही. काही अतिशहाणे त्यांच्याबद्दल पप्पूगिरी करतात आणि तसेच बोलतात. तरीही हा बंदा ताकास तूर लागू देत नाही हे आपण सगळ्यांनीच बघितलेले आहे. तरीही राहुल गांधी यांनी सावरकर यांचा फक्त उत्तरकालीन इतिहास वाचलेला आहे आणि तत्पूर्वीच्या इतिहासापासून ते अनभिज्ञ असावेत असे दिसत आहे. इंग्लंडमध्ये राहूनही स्वातंत्र्य मिळवण्यासाठी सावरकरांनी जी मातृभूमीची सेवा केली. देशाला स्वतंत्र करण्यासाठी जे काही योगदान दिलेले आहे. त्याबद्दलही राहुल गांधी यांनी बोलावयास हवे होते. एखाद्या व्यक्तीविषयी कुठलीही गोष्ट बोलताना त्या व्यक्तीचे संपूर्ण जीवन आणि त्याने केलेला त्याग याविषयी परिपूर्ण अभ्यास करणे गरजेचे होते. परंतु यादृष्टीने राहुल गांधी आणि कधीच विचार केला नसावा. त्यामुळेच समग्र सावरकर त्यांना माहीत नसावेत. उदाहरणादाखल सांगायचे झाले तर, सावरकरांनी समुद्रात उडी मारल्यावर तत्कालीन ब्रिटिश साम्राज्याच्या पोलिसांनी त्यांना फ्रान्सच्या भूमीत म्हणजेच मार्सेलिस बंदरामध्ये अटक केली होती आणि ती अटक बेकायदेशीर होती, हे इतिहास ओरडून सांगतो. कारण आजच्या काळात अमेरिकेचा डोनाल्ड ट्रम्प जी दादागिरी करतो, तशी दादागिरी त्या काळात इंग्लंड करीत असायचा. त्यामुळेच सावरकरांना फ्रान्समध्ये अटक करण्यात आली असावी, कारण त्यावेळी इंग्रजांच्या साम्राज्यावर सूर्य कधीही मावळत नव्हता असे म्हणतात. राहुल गांधी यांना हेच माहीत नाही की सावरकरांना स्वातंत्र्यवीर का म्हणतात खरे तर त्यांनी याचाही अभ्यास करणे गरजेचे होते. स्वातंत्र्यासाठी श्यामजी कृष्णवर्मा यांच्यासोबत राहून बॅरिस्टर सावरकर यांनी केलेले प्रयत्न निश्चितच देशभक्ती आणि स्वातंत्र्य मिळवण्यासाठी केलेल्या कमार्चा परमोच्च बिंदू होता. आपल्या जीवाची पर्वा न करता त्यांनी जे काही शौर्य दाखवले त्याचा इतिहास निश्चितच गौरवशाली आहे. आपल्या माझे मृत्युपत्र या कवितेमध्ये सावरकर म्हणतात,

'हे काय ! असतो बंधु सात आम्ही,
त्वत्स्थंडिलींच असते दिधलें बळी मी'

हे लिहिणारे सावरकर देशभक्त नाहीत असे म्हणणे कुणालाही पटणारे नाही. सावरकरांनी त्यांच्या अंदमान मधल्या जेल यात्रेत जे कष्ट सोसले, इंग्रजांनी त्यांना ज्या काही यातना दिल्या त्या निश्चितच भयंकर आणि घनघोर होत्या. केवळ दृढप्रतिज्ञ आणि प्रखर देशभक्त असल्यामुळे सावरकर जिवंत राहिले. भारताला स्वतंत्र पाहण्यासाठी निग्रही शक्तीच्या बळावर जिवंत राहण्याकरता गनिमी कावा करून सावरकरांनी स्वतःला मुक्त करून घेतले. हाही इतिहास आहे, हे सर्वांनी जाणून घेतले पाहिजे. एकूणच समग्र सावरकरांचा विचार केल्यावर सावरकर निश्चित स्वातंत्र्यवीर आहेत यात अजिबात शंका नाही. तुरुंगात राहून मरण पत्करण्यापेक्षा जिवंत राहून देशसेवा करण्याचा त्यांचा मानस राहुल गांधी यांनीही समजून घ्यावा. तांत्रिकदृष्ट्या भले त्यांनी माफी मागितली असेल. तरी त्यावरून त्यांच्यासारख्या व्यक्तीने इंग्रजांची सेवा केली असे म्हणता येणार नाही, अजिबात म्हणता येणार नाही. त्यामुळेच नाशिकच्या न्यायालयाने सावरकरांची आणि आरोप करणाऱ्यांची सुटका केली असावी.


nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023


## ७० कोटी खर्चाचे संत्री क्लीन प्लॅन्ट केंद्र

# नागपुरात स्थापन होणार!

केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंग चव्हाण यांचे आश्वासन
ॲग्रोव्हीजन कृषी प्रदर्शनीचे भव्य उद्घाटन
नागपूर विद्यापीठाच्या मैदानावर विस्तृत आयोजन

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २१ :**
नागपुरात ७० कोटी खर्चाचे संत्र्याचे क्लीन प्लांट सेंटर स्थापन होणार असल्याची घोषणा केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंग चौहान यांनी आज केली. ॲग्रोव्हीजन २०२५ या भव्य कृषि प्रदर्शनाचे उद्घाटन आज त्यांच्या हस्ते नागपूर विद्यापीठाच्या अमरावती रोड वरील मैदानावर झाले त्यावेळी ते बोलत होते.

ॲग्रोव्हिजनचे मुख्य प्रवर्तक केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमाला राज्याचे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, कृषी राज्यमंत्री आशिष जयस्वाल, सहकारिता राज्यमंत्री डॉ.पंकज भोयर, माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार, एनडीडीबीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. मिनेश शाह, एसएमएलच्या कोमल यांची विशेष उपस्थिती होती.

चौहान पुढे म्हणाले की शेतकऱ्यांना चांगले रोप मिळाले तरच ते चांगले उत्पादन घेऊ शकतील. मोठ्या नर्सरीला ४ कोटी पर्यन्त अर्थसहाय्य आणि छोट्या तसेच मध्यम नर्सरीला २ कोटी पर्यन्त अर्थसहाय्य केले जाईल असे त्यांनी सांगितले.

शेतकरी हा अन्नदाता असून त्यांचे जीवनमान सुधारण्यावर आपला भर आहे. डालमिल उघण्यासाठी सबसिडी दिली जात असल्याचा उल्लेख त्यांनी यावेळी केला. तत्पूर्वी आयोजन सचिव रवी बोरटकर यांनी स्वागतपर भाषण केले.

यंदा आयोजित विशेष कार्यशाळा आणि परिषदा, तसेच शेतकरी लाभ शेतकऱ्यांनी घ्यावा असे आवाहन त्यांनी केले. सुरवातीला ॲग्रोव्हीजन २०२५ चे विधिवत उद्घाटन दीपप्रज्वलन करून आणि शेतकरी गीताच्या सादरीकरणाने झाले.

कार्यक्रमात राज्याचे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे, एनडीडीबीचे प्रमुख मिनेश शाह यांचीही भाषणे झालीत . नागपूर विद्यापीठाच्या कुलगुरू माधवी खोडे, पीडीकेव्ही चे कुलगुरू डॉ. शरद गडाख, डॉ. माफसुचे कुलगुरू नितीन पाटील, ग्लोबल कॉर्पोरेट अँड इंडस्ट्री सागर कौशिक, महिंद्राचे अध्यक्ष विजय राम नाकरा, एग्रोव्हीजन आयोजन समितिचे सल्लागार डॉ. सीडी माई, डॉ.गिरीश गांधी, आयोजन सचिव रवी बोरटकर, रमेश मानकर, ॲग्रोव्हिजन फाउंडेशनचे सदस्य, सुधीर दिवे, विजय जाधव, कॅप्टन एल. बी. कलंत्री, समय बनसोड, प्रशांत कुकडे, डॉक्टर हितेंद्र सिंग, नितीन कुलकर्णी यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रेणुका देशकर यांनी केले.

(अधिक वृत्त पान ८ वर)





### ॲग्रो कन्व्हेन्शन सेंटर शेतकऱ्यांचे आर्थिक विकास केंद्र बनणार



स्पेन मध्ये ज्याप्रकारे फार्मर बिजनेस स्कूल आहे, त्याच धर्तीवर अमरावती रोडवरील पीडीकेव्ही मैदानावर ॲग्रो कन्वेंशन सेंटर मध्ये जागतिक दर्जाचे फार्मर बिजनेस स्कूल तयार होत असून, त्याचा लाभ विदर्भातीलच नव्हे तर संपूर्ण देशातील शेतकऱ्यांना होईल आणि त्यांचा आर्थिक विकास झपाट्याने होऊ शकेल असा आशावाद केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केला. दरम्यान नुकत्याच स्पेन मधील संत्रा तंत्रज्ञानावर घेतलेल्या कार्यशाळेत अनेक शेतकऱ्यांनी लाभ घेतला असून विदर्भासह नजीकच्या क्षेत्रातील शेतकरी येत्या काही वर्षात एकरी दहा ते बारा टन संत्र्याचे उत्पादन घेऊ शकतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तत्पूर्वी ॲग्रोव्हिजनने गेल्या १६ वर्षात शेतकऱ्यांच्या आयुष्यात परिवर्तन करण्यासाठी प्रयत्न केल्याचे ते म्हणाले. लिंबूवर्गीय कलमांच्या अधिकृत नर्सरीमध्ये वृद्धी व्हावी अशी विनंती त्यांनी केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंग चौहान यांना केली. असे झाल्यास शेतकऱ्यांना प्रतीक्षा यादीत राहावे लागणार नाही असे ते म्हणाले. याशिवाय कृत्रिम बुद्धिमत्तेने उसाच्या शेतीमध्ये मोठे परिवर्तन होऊन प्रतिएकर उत्पादन अधिक होऊ शकते यावर त्यांनी प्रकाश टाकला. याशिवाय दुग्ध उत्पादन मत्स्यपालन सोयाबीन उत्पादन या विषयावर त्यांनी सविस्तर चर्चा केली.

## महायुतीत तणाव शिगेला?

### फडणवीस, शिंदेंमध्ये ना संवाद, ना उत्साह

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. २१ :**
महाराष्ट्राच्या राजकारणात तापलेले वातावरण हुतात्मा स्मारका वरील क्षणांमधूनच दिसून आले. मुख्यमंत्री फडणवीस आणि उपमुख्यमंत्री शिंदे एकमेकांच्या जवळ उभे असतानाही नेहमीचा संवाद, उत्साह आणि सहजता दिसली नाही.



दोघांची तणावपूर्ण देहबोली पाहून महायुतीत सर्व काही आलबेल नसल्याचे चित्र आणखी ठसठशीत झाले. हुतात्मा स्मारकावरील कार्यक्रमात फडणवीस आणि एकनाथ शिंदे आमनेसामने आले तरी दोघांची देहबोली मात्र पूर्णपणे बदललेली दिसली. औपचारिक नमस्कारानंतरही नजरा टाळणे, संवाद न घडणे आणि वातावरणातील ताण स्पष्ट जाणवत असल्याने महायुतीतील दुरावा आता उघडपणे समोर आल्याचे संकेत आहे.

महायुतीतील तणाव आणखी उफाळला असून, शिंदे आणि भाजपचे नेते रवींद्र चव्हाण यांच्यातील मतभेद समोर आले आहेत. शिंदे यांनी दिल्ली गाठून केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्याकडे गाऱ्हाणे मांडले. मात्र, शाह यांनी परिस्थितीवर आपले लक्ष असल्याचे सांगून फारसा ठोस प्रतिसाद दिला नसल्याची मोठ्या प्रमाणात चर्चा आहे. त्यामुळे शिंदे यांच्या नाराजीत आणखी वाढ झाल्याचे मानले जात आहे.

## रिजेक्ट कोळशाच्या डेपोंवर छापे

■ **महासागर प्रतिनिधी यवतमाळ, दि. २१ :**
प्रदूषणकारक रिजेक्ट कोळशाची खुलेआम विक्री करणाऱ्या माफियांवर कारवाईचा बडगा उगारण्यात आला आहे. केंद्रीय कोळसा मंत्रालयाच्या आदेशानुसार, यवतमाळ स्थानिक गुन्हे शाखेने वणीतील लालपुलिया परिसरातील कोळसा डेपोंवर धडक कारवाई केली. निकृष्ट कोळशाच्या अवैध साठवणूक आणि विक्रीप्रकरणी नमुने जप्त करण्यात आले.

वणी परिसरातील लालपुलिया भागात कोळसा माफियांचा सुळसुळाट वाढला होता. छत्तीसगडमधून अत्यंत स्वस्त दरात खरेदी केलेला प्रदूषणकारी रिजेक्ट कोल चांगल्या दर्जाच्या कोळशात मिसळून तो विकला जात असल्याची धक्कादायक माहिती होती. नागपूर, चंद्रपूर आणि वणी येथील काही स्थानिक व्यापाऱ्यांनी अवैध साठवणूक आणि विक्रीचा गोरखधंदा सुरू केला होता. त्याविरोधात कारवाई केली गेली.

## दुबई एअर शोमध्ये कोसळले तेजस

### पायलटचा मृत्यू : डेमो फ्लाइट दरम्यानची घटना



■ **वृत्तसंस्था, दुबई, दि. २१ :**
दुबई एअर शोमध्ये भारतीय हवाई दलाचे तेजस लढाऊ विमान कोसळले. अल मकतूम विमानतळावर सुरू असलेल्या एअर शोमध्ये डेमो फ्लाइट दरम्यान हा अपघात झाला. शुक्रवारी दुबई वेळेनुसार दुपारी २:१० आणि भारतीय वेळेनुसार दुपारी ३:४० वाजता हा अपघात झाला.

या अपघातात तेजसच्या वैमानिकाचाही मृत्यू झाल्याची पुष्टी भारतीय हवाई दलाने केली. विमान कोसळताच त्याला आग लागली आणि विमानतळावर काळ्या धुराचे लोट दिसले. भारतीय हवाई दलाने लढाऊ विमान अपघाताचे कारण शोधण्यासाठी चौकशी न्यायालय स्थापन केले आहे.

हवाई दलाच्या तेजस जेट अपघाताची ही दुसरी घटना आहे. यापूर्वी, २०२४ मध्ये, राजस्थानच्या पोखरण येथे एका युद्धाभ्यास दरम्यान इंजिन बिघाडामुळे तेजस विमान कोसळले होते.

दुबई एअर शो हे एक आंतरराष्ट्रीय विमान प्रदर्शन आहे. प्रमुख एरोस्पेस कंपन्या, विमान कंपन्या, हवाई दल आणि तंत्रज्ञान कंपन्या त्यांचे नवीन विमान, हेलिकॉप्टर, शस्त्रास्त्र प्रणाली आणि एरोस्पेस तंत्रज्ञान प्रदर्शित करतात.

दुबई एअर शो १९८९ मध्ये सुरू झाला आणि दुबईच्या अल मकतूम आंतरराष्ट्रीय विमानतळावर दर दोन वर्षांनी आयोजित केला जातो. तेजसने सहभागी होण्याचे हे सलग तिसरे वर्ष आहे.

या अपघातात वैमानिकाचा मृत्यू झाला आहे. भारतीय वायुसेनेने या दुःखद घटनेबद्दल तीव्र शोक व्यक्त केला आहे आणि म्हणाले की, आम्ही या कठीण काळात मृत वैमानिकाच्या कुटुंबासोबत आहोत. अपघाताचे कारण निश्चित करण्यासाठी चौकशी न्यायालय स्थापन केले जात आहे.

युएईच्या संरक्षण मंत्रालयाने सोशल मीडियावर जाहीर केले की, दुबई एअर शोमध्ये आजच्या उड्डाण प्रदर्शनादरम्यान एक भारतीय तेजस लढाऊ विमान कोसळले, ज्यामध्ये पायलटचा मृत्यू झाला.


करिअरच्या सुवर्णसंधी!

महासागर

विदर्भाचे प्रसिद्ध मराठी दैनिक, गरजू व्यक्तींसाठी सुवर्णसंधी!

तत्काळ भरती - नवी संधी

महासागर, विदर्भाचे प्रसिद्ध मराठी दैनिक, ५५ वर्षांचा अनुभव असलेले, विदर्भ, मुंबई, पालघर आणि नाशिक येथे प्रकाशित होणारे, गरजू व्यक्तींसाठी सुवर्णसंधी!

१. समाचार संपादक (न्यूज एडिटर)
- मराठीमध्ये उत्कृष्ट कमांड
- ५ वर्षांचा अनुभव

२. असिस्टंट जाहिरात व्यवस्थापक (एडव्हर्टायझमेंट असिस्टंट मॅनेजर)
- अनुभव असलेल्या उमेदवारांना प्राधान्य
- शेड्युलिंगचे ज्ञान

३. इव्हेंट मॅनेजर
- अनुभव असलेल्या उमेदवारांना प्राधान्य
- पुरुष/महिला

४. सर्क्युलेशन मॅनेजर
- विदर्भातील जिल्ह्यांचे ज्ञान आवश्यक
- अनुभव असलेल्या उमेदवारांना प्राधान्य

५. एकाउंटंट
- पुरुष/महिला
- न्यूजपेपर बिलिंग आणि अकाउंटन्सीचे ज्ञान आवश्यक

अनुभव असलेल्या उमेदवारांना प्राधान्य

मुलाखत दिनांक व वेळ

• दिनांक: मंगळवार, दि. २५ नोव्हेंबर २०२५ • वेळ : दु.१२:00 ते ३:00 वाजेपर्यंत
स्थान: महासागर, चांडक ले-आउट, कॉटन मार्केट, नागपूर

आपले बायोडाटा आणि आवश्यक दस्तऐवज साथ लावून उपस्थित राहावे.


## ..खरंतर मी धर्मनिरपेक्ष

### सरन्यायाधीश भूषण गवई यांचे वक्तव्य

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २१ :**
सरन्यायाधीश भूषण गवई यांनी निवृत्तीपूर्वीच्या शेवटच्या कामकाजाच्या दिवशी एक महत्त्वपूर्ण विधान करून सर्वांचे लक्ष वेधले. मी वैयक्तिक जीवनात बौद्ध धर्माचे पालन करतो, पण खरंतर मी धर्मनिरपेक्ष आहे. सर्व धर्मांवर माझा विश्वास आहे, असे वक्तव्य त्यांनी केले.



सुप्रीम कोर्ट ॲडव्होकेट्स ऑन रेकॉर्ड असोसिएशनच्या निरोप समारंभात बोलताना गवई यांनी त्यांच्या आयुष्यातील आठवणी, मूल्ये आणि न्यायपालिकेबद्दलची कृतज्ञता व्यक्त केली. गवई म्हणाले की, माझे वडील हे डॉ. आंबेडकरांचे अनुयायी होते, ते धर्मनिरपेक्ष होते. त्यांच्याकडूनच मी बंधुता, समानता, मानवता शिकत आलो.

डॉ. आंबेडकर आणि भारतीय राज्यघटनेमुळेच मी या सर्वोच्च पदापर्यंत आलो. अन्यथा नगरपालिकेच्या शाळेत जमिनीवर बसून शिकणाऱ्या एका मुलाने एवढं मोठं स्वप्न पाहणं कठीण होतं, असे त्यांनी आवर्जून सांगितले. ते म्हणाले की न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या प्रमुख घटनात्मक मूल्यांचे पालन करण्याचा त्यांनी न्यायमूर्ती आणि सरन्यायाधीश या दोन्ही भूमिकांत सातत्याने प्रयत्न केला. समाधानाने निवृत्त होत असल्याचेही ते म्हणाले.

## 'लाडकी'चा गैरफायदा घेणाऱ्या सरकारी कर्मचाऱ्यांवर

# शिस्तभंगाची कारवाई होणार?

### वेतनवाढही रोखणार

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २१ :**
मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा गैरफायदा घेणाऱ्या सरकारी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई होणार असून, त्यांची वेतनवाढही रोखली जाणार असल्याची माहिती पुढे आली आहे. यामुळे या योजनेचा गैरफायदा घेणारे सरकारी अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या पोटात भीतीचा गोळा उभा राहिला आहे.

महायुती सरकारने गतवर्षीच्या विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर लाडकी बहीण योजनेचा शुभारंभ केला होता. या योजनेंतर्गत पात्र लाभार्थी महिलांना दरमहा १५०० रुपयांचे अर्थसहाय्य दिले जात आहे. यामुळे महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणास मोठा फायदा झाला होता. पण या योजनेत सरकारी कर्मचारी व अधिकाऱ्यांच्या कुटुंबातील महिलाही शिरल्याची बाब समोर आली आहे. त्यामुळे सरकारने या योजनेची ई-केवायसी करणे बंधनकारक करून खऱ्या लाभार्थी महिला शोधण्याचे काम हाती घेतले आहे. त्याचे आता सकारात्मक परिणाम समोर येत आहेत.

माहितीनुसार, ई-केवायसीमुळे लाडकी बहीण योजनेचा अनेक सरकारी अधिकारी व कर्मचारी लाभ घेत असल्याचे निष्पन्न झाले आहे. या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर आता शिस्तभंगाची कारवाई केली जाणार आहे. याशिवाय योजनेंतर्गत मिळालेला आर्थिक लाभही त्यांच्याकडून वसूल केला जाणार आहे. एवढेच नाही तर त्यांची वेतनवाढ रोखली जाण्याची शक्यताही या प्रकरणी व्यक्त केली जात आहे. सद्यस्थितीत ५ हजार सरकारी कर्मचारी व ३ हजार शिक्षकांसह पोलिस व इतर विभागातील हजारो कर्मचाऱ्यांनी या योजनेचा गैरलाभ घेतल्याचे निष्पन्न झाले आहे. या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर महिला व बाल कल्याण विभागाकडून कारवाई केली जाणार आहे.

अडीच कोटी महिलांपैकी १ कोटी ३० लाख महिलांची आतापर्यंत ईकेवायसी पूर्ण झाली आहे. उर्वरित महिलांना ३१ डिसेंबरपर्यंत केवायसी पूर्ण करण्याची मुदत देण्यात आली आहे.

या कालावधीत ईकेवायसीची प्रक्रिया पूर्ण होणे अपेक्षित आहे. त्यानंतरही काही महिला उरल्या तर त्यांच्याविषयी स्थितीनुसार योग्य तो निर्णय घेतला जाणार आहे. काही विशिष्ट प्रकरणांत म्हणजे ज्या महिलांचे पती किंवा वडील दोघेही हयात नाहीत त्यांनी त्यांचे मृत्यू प्रमाणपत्र अंगणवाडी सेविका कार्यालयात दिल्यास त्यांनाही आपली ईकेवायसी पूर्ण करून योजनेचा लाभ घेता येणार आहे. तूर्त सध्या गैरलाभ घेतलेल्या कर्मचाऱ्यांची छाननी केली जात आहे. पुढील महिन्याभरात हे कर्मचारी कोणकोणत्या विभागातील आहेत हे स्पष्ट होईल.

## ४ शिक्षकांना डेरोजिओ पुरस्कार



■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २१ :**
कौन्सिल फॉर द इंडियन स्कूल सर्टिफिकेट एक्झामिनेशन्सने प्रतिष्ठित डेरोजिओ पुरस्कार २०२५ जाहीर केले. या वर्षी, शालेय शिक्षण आणि मानवी विकासात उल्लेखनीय योगदान दिल्याबद्दल चार शिक्षकांना सन्मानित केले जाईल.

शिनोज किझाक्केमुरीयल, मुख्याध्यापक, सेंट अँटोनी स्कूल, गाझियाबाद, प्रीती सिन्हा, मुख्याध्यापिका, गुलमोहर हायस्कूल, जमशेदपूर, सीना जोसेफ, प्राचार्य, ऑक्सिलियम नव ज्योती स्कूल, केरळ आणि कुसुम उनियाल, टीजीटी विज्ञान शिक्षक, ज्योती विद्यालय, जोशीमठ, उत्तराखंड यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे . शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय योगदान आणि देशभरातील शिक्षण समुदायांना समृद्ध करण्यात त्यांचे मोलाचे योगदान आहे.

## मंगल प्रभात लोढा यांना काँग्रेसच्या ज्येष्ठ आमदाराकडून धमकी



**मुंबई :** राज्यातील राजकारण पुन्हा एकदा तापले आहे. भाजपचे ज्येष्ठ मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी काँग्रेसच्या एका वरिष्ठ आमदाराकडून धमकी मिळाल्याचा गंभीर आरोप करत मुंबई पोलिसांकडे औपचारिक तक्रार नोंदवली आहे. मालवणीत सुरू असलेल्या सरकारी जागेवरील अतिक्रमणाबाबत करण्यात येणाऱ्या कारवाईमध्ये काही राजकीय व्यक्तींनी अडथळे आणत असल्याची आधीपासून चर्चा होती. मात्र, ही परिस्थिती आता राजकीय संघर्षात बदलत असल्याचे या प्रकरणामुळे समोर आले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मालवणी परिसरातील शासकीय जमिनीवर मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण झाले असून तेथील काही लोक निवासी असल्याचे भासवून अडथळे निर्माण करत असल्याचे लोढा यांनी आपल्या पत्रात नमूद केले आहे. या अतिक्रमणामुळे स्थानिक प्रशासनाला कारवाई करणे कठीण जात आहे. मंत्री लोढा यांनी या भागातील वास्तव परिस्थिती तपासताना कायद्याच्या पलीकडे काही शक्ती कार्यरत असल्याचा दावा केला आहे. त्यांनी सांगितले की, बेकायदेशीर बांधकामे थांबवण्याच्या मिशनमध्ये प्रशासन ठामपणे काम करत असताना काही लोक जाणूनबुजून दडपण आणून कारवाई रोखण्याचा प्रयत्न करत आहेत. लोढा यांनी आपल्या तक्रारीत असा उल्लेख केला आहे की, या अतिक्रमणाशी संबंधित काही व्यक्तींना पाठिंबा देणारा काँग्रेसचा वरिष्ठ आमदार थेट धमकीपर्यंत उतरला. या सर्व घटनेचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर फिरत असून त्याची लिंकही पोलिसांना पुरावा म्हणून दिल्याचे त्यांनी सांगितले. या प्रकारामुळे अवैध कृत्यांना राजकीय संरक्षण असल्याची भावना अधिकच बळावली आहे.

## मालेगावच्या आक्रोश मोर्चात उसळला जनसागर
# आंदोलकांचा न्यायालयात शिरण्याचा प्रयत्न

■ **महासागर प्रतिनिधी, मालेगाव, दि. २१ :** मालेगाव तालुक्यातील डोंगराळे येथे चिमुकलीवर अत्याचार करून तिची निर्घृणपणे हत्या झाल्याच्या प्रकारामुळे संपूर्ण महाराष्ट्र हादरुन गेला आहे. या घटनेनंतर सर्वत्र संतापाची लाट उसळली आहे. या प्रकाराचा निषेध तसेच मारेकऱ्यास तात्काळ फाशी द्यावी, या मागणीसाठी शुक्रवारी मालेगाव शहर व तालुका भागात कडकडीत बंद पाळण्यात येत आहे.

तसेच येथील अप्पर जिल्हाधिकारी कार्यालयावर जनआक्रोश मोर्चा काढण्यात आला. यावेळी संतप्त आंदोलन बिथरल्याचे बघावयास मिळाले. त्यातून त्यांनी कोर्टात शिरण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे पोलिसांची चांगलीच धावपळ उडाली. यावेळी आंदोलकांना शांत करण्यासाठी पोलिसांना बळाचा वापर करावा लागला.




साडेतीन वर्षीय चिमुकलीवर अत्याचार करून तिची निर्घृणपणे हत्या करण्याचा प्रकार मालेगावपासून ३० किलोमीटर अंतरावरील डोंगराळे गावात गेल्या रविवारी रात्री उघडकीस आला. यामुळे सर्वत्र संतापाची लाट उसळली आहे. याप्रकरणी विजय खैरनार (२४) या संशयीताला पोलिसांनी लगेचच अटक केली. न्यायालयाने सुरुवातीला त्याला चार दिवसाची पोलीस कोठडी दिली. या कोठडीची मुदत संपल्याने गुरुवारी त्याला न्यायालयात आणण्यात येणार होते.

परंतु न्यायालय परिसरात जमलेल्या संतप्त जमावाचा अवतार बघता कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो,अशी भीती निर्माण झाल्याने पोलिसांनी व्हिडिओ कॉन्फरसिंगद्वारे त्याला न्यायालयापुढे सादर केले. न्यायालयाने सात दिवसांसाठी त्याच्या पोलीस कोठडीची मुदत वाढवून दिली आहे. मृत चिमुकलीला श्रद्धांजली आणि संशयीताला तात्काळ फासावर लटकवावे, या मागणीसाठी शुक्रवारी मालेगाव शहर व तालुका भागात उत्स्फूर्तपणे बंदचे आयोजन करण्यात आले. शहरातील हिंदू-मुस्लिम अशा सर्वच भागात अभूतपूर्व व कडकडीत बंद पाळण्यात येत आहे.

यासंदर्भात येथील रामसेतू पुलापासून अप्पर जिल्हाधिकारी कार्यालयावर जन आक्रोश मोर्चा काढण्यात आला. मोर्चात महिलांची उपस्थिती लक्षणीय होती.

शहरासह ग्रामीण भागातील महिला पुरुषांची व विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या प्रमाणावर मोर्चात सामील झाले. या मोचार्तील उपस्थितीमुळे रस्त्यांवर जनसागर उसळल्याचे चित्र दिसत होते.न्याय द्या न्याय द्या, चिमुकलीला न्याय द्या तसेच नराधमाला तात्काळ फाशी द्या,अशा घोषणा मोर्चेकऱ्यांनी दिल्या. मोर्चाच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी चोख बंदोबस्त तैनात केला होता.

## जालन्यातील १३ वर्षीय विद्यार्थिनींची आत्महत्या

■ **महासागर प्रतिनिधी जालना, दि. २१ :** जालना शहरात एक अत्यंत वेदनादायक घटना उघडकीस आली आहे. सीटीएमके गुजराती विद्यालयात शिकणारी १३ वर्षीय आरोही दीपक बिटलान हिने शाळेच्या इमारतीच्या छतावरून उडी मारत आयुष्य संपवले. आठवीत शिक्षण घेत असलेल्या या विद्यार्थिनीच्या मृत्यूने संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

आरोहीने आत्महत्या का केली याबाबत अद्याप निश्चित माहिती समोर आलेली नसली तरी, तिच्या पालकांनी शाळेतील काही शिक्षकांवर गंभीर आरोप करत हा मृत्यू छळामुळे झाल्याचा दावा केला आहे. शिक्षकांकडून होत असलेल्या मानसिक छळाला कंटाळूनच मुलीने असे टोकाचे पाऊल उचलल्याचा त्यांचा आरोप असून, त्यामुळे या प्रकरणाला नवे वळण मिळाले आहे.

घटनेची माहिती मिळताच सदर बाजार पोलिसांनी तत्काळ पुढील प्रक्रिया सुरू केली. पोलिस अधिकारी संदीप भारती यांनी दिलेल्या माहितीनुसार, रुग्णालयामार्फत घटनेची माहिती मिळाल्यानंतर एडीआर म्हणजेच अपघाती मृत्यू अहवाल नोंदवण्यात आला आहे. प्रकरणाचा सखोल तपास करण्यासाठी तीन विशेष पोलिस पथके गठीत करण्यात आली असून, कुटुंबीयांचे बयान नोंदवण्याची प्रक्रिया सुरू आहे.

## मित्रपक्षातून येणाऱ्यांना थांबवा
### शिंदेंचे शिवसेना नेत्यांना आदेश



**मुंबई :** भाजप-शिंदेसेनेत पदाधिकारी फोडाफोडीवरून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी दिल्लीत बुधवारी केंद्रीय गृहमंत्री अमित शाहांची भेट घेतली. नाव न घेता फडणवीस, भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाणांवर तीव्र नाराजी व्यक्त केली. मात्र, गुरुवारी शिंदेंनी नवा पवित्रा घेतला. मित्रपक्षातून शिंदेसेनेत येणाऱ्यांना थांबवा, असे आदेश त्यांनी शिवसेना नेते, मंत्र्यांना दिले आहेत. सूत्रांनी सांगितले की, शिंदेसेनेचे मंत्रीही काही ठिकाणी भाजप कार्यकर्ते, पदाधिकारी फोडत असल्याचे अप्रत्यक्षपणे शाह यांनी सूचित केले. त्यामुळे शिंदेंनी ठाणे, रत्नागिरी, मराठवाडा, नवी मुंबई, रायगड भागातील भाजपचे इनकमिंग रोखण्याचे आदेश दिले. मी तक्रारींचा पाढा वाचत रडणारा नव्हे, लढणारा आहे. राज्यातील छोटे-मोटे वाद आम्ही राष्ट्रीय पातळीवर आणत नसतो, असा दावा त्यांनी केला. तर भाजपचे मंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, नगरविकास खात्याविषयीचे प्रश्न घेऊन शिंदे शाहांना भेटले होते.

# काँग्रेसची उद्धव ठाकरेंना ऑफर
### महापालिकांच्या निवडणुकीआधी नवे राजकीय समीकरण

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २१ :** मुंबई महापालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यातील राजकीय घडामोडी पुन्हा एकदा रंगत आहेत. महाविकास आघाडीतून वेगळे पडलेल्या मुद्द्यांना आज पुन्हा नवी दिशा मिळू लागली आहे. काँग्रेसमधील काही वरिष्ठ नेत्यांनी उद्धव ठाकरे यांना मनसेची साथ सोडून पुन्हा काँग्रेससोबत येण्याची ऑफर दिल्याची माहिती सूत्रांकडून समजते. उद्धव ठाकरे यांनी महाविकास आघाडीच्या काळात काँग्रेसला विश्वासात न घेता मनसेसोबत संपर्क वाढवल्याने काँग्रेसमध्ये निर्माण झालेली नाराजी अद्याप पूर्णपणे निवळलेली नाही. त्यामुळेच काँग्रेसने एकला चलो रेची तयारी सुरू केली होती. मात्र आता पुन्हा उद्धव ठाकरेंशी संवादाचे दरवाजे उघडण्याची तयारी दिसत आहे.



काँग्रेसने आधीच मुंबई महापालिका स्वतंत्रपणे लढण्याची भूमिका जाहीर केली आहे. तरीही सूत्रांच्या माहितीनुसार, उद्धव ठाकरे जर मनसेसोबतची जाण्याची शक्यता संपुष्टात आणून काँग्रेससोबत आले, तर काँग्रेस स्वबळाबाबत पुनर्विचार करू शकते. मात्र त्यासाठी काही ठोस शर्तीची अट काँग्रेस ठेवू शकते, अशी चर्चा आहे. दुसरीकडे, मनसे या चर्चेने अजिबात विचलित झालेली नाही, असे दिसते. मनसे नेते संदीप देशपांडे म्हणाले की, मनसे हा स्वतंत्र पक्ष आहे. आमचे निर्णय राज ठाकरे घेतील. इतर कोण काय म्हणतात याचा आमच्याशी संबंध नाही.

# एफडीएची राज्यव्यापी मोहीम
### नियमभंग करणाऱ्या रेस्टॉरंटचे परवाने रद्द होणार : झिरवाळ

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. २१ :** नववर्षाच्या पार्श्वभूमीवर अन्न व औषध प्रशासनाकडून राज्यातील हॉटेल रेस्टॉरंटसाठी कडक मोहीम राबवण्यात येणार आहे. ३१ डिसेंबरपर्यंत संपूर्ण राज्यातील उपाहारगृहांची व्यापक तपासणी होणार आहे. नियमभंग करणाऱ्या हॉटेलांचे परवाने रद्द होणार आहेत, अशी माहिती अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी दिली. गुरुवारी मंत्रालयातील आढावा बैठकीत झिरवाळ यांनी एफडीए अधिकाऱ्यांना विशेष तपासणीचे आदेश दिले. झिरवाळ यांनी सांगितले की, नववर्षाच्या पार्ट्यांची धामधूम लक्षात घेता नागरिकांना स्वच्छ, सुरक्षित व अन्न मिळावे तसेच उपाहारगृहातील वातावरण अधिक चांगले राखले जावे,



यासाठी ही मोहीम हाती घेण्यात येणार आहे. स्वच्छतेचे उत्तम पालन करणाऱ्या हॉटेलांचा गौरवदेखील करण्यात येणार आहे. अस्वच्छता आणि अन्नगुणवत्तेतील त्रुटींमुळे नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होऊ शकतो, त्यामुळे एफडीए दरवर्षी नियमित तपासण्या करतेच. मात्र या वर्षी ३१ डिसेंबरच्या पार्श्वभूमीवर ही कारवाई अधिक व्यापक आणि प्रभावी असणार आहे. या कारवाईदरम्यान अन्नाचे नमुने तपासले जातील. विनापरवाना चालणाऱ्या आस्थापनांवर थेट कारवाई केली जाईल. नोटिसीनंतर १५ दिवसांनी फेरतपासणी होऊन सुधारणा न करणाऱ्या हॉटेलांचा परवाना निलंबित किंवा थेट रद्द करण्यात येईल.

## ऑफिसबाहेर येताच बिल्डरला घातल्या गोळ्या

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २१ :** मुंबईतील एका बिल्डरवर गत बुधवारी गोळीबार झाल्याची घटना घडली होती. या घटनेचा आता अंगावर काटा आणणारा एक व्हिडिओ समोर आला आहे. त्यात हल्लेखोर बिल्डरला ऑफिसबाहेर येताच गोळ्या घालताना व त्यानंतर बिल्डर जमिनीवर वेदनांनी विव्हळताना दिसून येत आहे. हा व्हिडिओ सोशल मीडियात चांगलाच व्हायरल झाला आहे.

यासंबंधीच्या माहितीनुसार, कांदिवलीच्या चारकोप परिसरात बंदर पाखाडी येथील पेट्रोल पंपासमोर गत बुधवारी 42 वर्षीय फ्रेंडी दिलीमा भाई नामक बांधकाम व्यावसायिकावर अज्ञात हल्लेखोरांनी गोळीबार केला होता. ही घटना घडली तेव्हा फ्रेंडी दिलीमा भाई हे आपल्या ऑफिसमध्ये बसले होते. तेथून ते बाहेर येऊन आपल्या सहकाऱ्यासोबत कारच्या दिशेने जात होते. ते कारमध्ये बसताना अचानक तिथे दबा धरून बसलेल्या हल्लेखोरांनी त्यांच्या दिशेने गोळीबार केला. त्यात फ्रेंडी दिलीमा भाई यांच्या पोटात 2 गोळ्या लागल्या. ते जबर जखमी झाले.

### लाडकी बहीण योजनेत एकल महिलांना दिलासा
## ई-केवायसीसाठी पर्यायी सुविधा




■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २१ :** राज्यातील मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या ई-केवायसी प्रक्रियेमुळे गेल्या काही दिवसांत अनेक महिलांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत होते. योजनेतील पारदर्शकता वाढवण्यासाठी शासनाने ई-केवायसी बंधनकारक केली असली, तरी पती किंवा वडिलांचे आधार कार्ड उपलब्ध नसलेल्या महिलांमध्ये नाराजी पसरली होती. विशेषतः विधवा, निराधार, घटस्फोटित किंवा ज्या महिलांचे पालक, पती दोघेही हयात नाहीत अशा लाभार्थींना ई-केवायसीच्या नियमांमुळे मोठी समस्या निर्माण झाली होती. ही परिस्थिती लक्षात घेऊन राज्य सरकारने आता अशा महिलांसाठी खास सुविधा उपलब्ध करून दिली आहे. या सुविधेमुळे आधार क्रमांक नसतानाही ई-केवायसी पूर्ण करता येणार असून अनेक महिलांना मोठा दिलासा मिळाला आहे. सरकारच्या नव्या निर्णयानुसार, ज्या महिलांचे पती किंवा वडील हयात नाहीत किंवा त्या घटस्फोटित आहेत, अशांना आधारच्या जागी अधिकृत मृत्यू प्रमाणपत्र, घटस्फोट प्रमाणपत्र किंवा न्यायालयाचा आदेश सादर करता येणार आहे.

# सीएनजीचा पुरवठा सुरळीत

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. २१ :** सीएनजीच्या अभावामुळे मुंबईतील रस्ते मार्गावरील वाहतूक कोलमडली होती. विशेषतः रिक्षा, टॅक्सी, शालेय बस, खासगी वाहनांना फटका बसला होता. मुंबई महानगरात सीएनजीचा पुरवठा सुरळीत झाल्याने परिस्थिती पूर्वपदावर आली आहे.

पेट्रोल, डिझेलमुळे पर्यावरणाची हानी होत असल्याने, सीएनजी किंवा विद्युत वाहनधारकांची संख्या कमालीची आहे. परंतु, ट्रॉम्बे येथील आरसीएफ परिसरात गेलच्या मुख्य वायू पुरवठा वाहिनीमध्ये रविवारी बिघाड झाला. यामुळे वडाळा येथील एमजीएलच्या सिटी गेट स्टेशन (सीजीएस) येथे रविवारी वायू पुरवठा प्रभावित झाला.

सीजीएस वडाळा येथे वायू पुरवठा थांबल्यामुळे आणि एमजीएल वाहिनी जोडणीमुळे मुंबई महानगरातील अनेक सीएनजी पंप मंगळवारी दुपारपर्यंत बंद होते. तर, अनेक पंपांवर सीएनजीचा दाब अत्यंत कमी होता. सीएनजी पंपावर सीएनजीचा दाब हा सामान्यतः २०० ते २५० किलो/सेमी वर्ग असतो. परंतु, सोमवारी हा दाब १४०-१५० किलो/सेमी वर्गापर्यंत घसरला होता. मंगळवारी तो १८० किलो/सेमी वर्गापर्यंत वाढला. परंतु सामान्य दाब पूर्ववत झाला नव्हता. सीएनजी पंपावर मंगळवारी सायंकाळनंतर वाहनांच्या लांबच्या लांब रांगा लागल्या होत्या.

मात्र आता परिस्थिती सुधारली असून, सर्व पंपावर योग्य दाबाने सीएनजीचा पुरवठा होत आहे, असे महानगर गॅस लिमिटेडकडून (एमजीएल) स्पष्ट करण्यात आले. सध्या सर्व पंपांवर निश्चित आणि आवश्यक तेवढ्या स्थिर दाबाने सीएनजीचा पुरवठा होत आहे.

# क्लायमेट इनोव्हेशन चॅलेंजचा शुभारंभ

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २१ :** भारताच्या पहिल्या जागतिक हवामान कृती आणि सोल्युशन प्लॅटफॉर्मपैकी एक असलेल्या मुंबई क्लायमेट वीक फेब्रुवारी 2026 मध्ये होणाऱ्या प्रमुख कार्यक्रमापूर्वी आज क्लायमेट इनोव्हेशन चॅलेंजच्या शुभारंभाची घोषणा केली. भारत आणि ग्लोबल साउथमध्ये मोठ्या प्रमाणावर लागू करता येतील अशा नवीनतम हवामान उपायांना ओळख, चाचणी आणि व्यापक प्रसार देण्यासाठी डिझाइन केलेला हा बहुपदरी आणि अभिनव उपक्रम आहे.

महाराष्ट्र शासन, बृहन्मुंबई महानगरपालिका आणि प्रोजेक्ट मुंबई यांच्या भागीदारीतून आयोजित टउह हे जगभरातील हवामान तज्ज्ञ, युवक, नवोन्मेषक, नागरी संस्था, विद्यार्थी, उद्योग आणि परोपकारी संस्थांना एकत्र आणणारे व्यासपीठ आहे. हा कार्यक्रम 17-19 फेब्रुवारी 2026 रोजी जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटर, मुंबई येथे होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना या कार्यक्रमाच्या उद्घाटनासाठी आमंत्रित करण्यात आले आहे.

नॅशनल स्टॉक एक्सचेंज हा इनोव्हेशन चॅलेंज पार्टनर म्हणून या उपक्रमाचे नेतृत्व करणार आहे. हवामान बदल शमन, अनुकूलन आणि रेसिलियन्ससाठी आवश्यक नवोन्मेषाकडे प्रकाशझोत टाकण्याचे उद्दिष्ट आहे.

स्टार्टअप्स, विद्यार्थी, संशोधक, नवोन्मेषक आणि क्लायमेट उद्योजक यांना यात सहभागी होण्याचे आमंत्रण देण्यात आले आहे. अंतिम सादरीकरण MCW 2026 मध्ये मंचावर करण्यात येईल. ग्लोबल साउथमधील अनेक देशांना आमंत्रित करण्यात आले असून, ही स्पर्धा भारतातील उपायांना जागतिक दृश्यात स्थान देणारी ठरेल.

महाराष्ट्र शासन, माझी वसुंधरा, आणि अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संस्थांनी MCW ला साथ दिली आहे. ज्यामुळे हा उपक्रम जागतिक आणि स्थानिक नेतृत्वाचा अद्वितीय संगम ठरतो. मुंबई क्लायमेट वीक हे नागरिक-केंद्रित उपक्रम म्हणून रचले गेले आहेत. हवामान कृती , संवाद आणि विविध क्षेत्रांतील म्हणजेच चित्रपट, पाककला, कला, क्रीडा, आरोग्य यातील हवामानाशी संबंधित चर्चा आणि उपक्रमांना चालना देणार आहे. राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांच्या मदतीने महाविद्यालयेही मोठ्या प्रमाणावर या प्रक्रियेत सहभागी होतील. प्रोजेक्ट मुंबईचे संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी शिशिर जोशी यावेळी म्हणाले की, मुंबई क्लायमेट वीक हे कल्पनांना प्रत्यक्ष कृतीत बदलण्यासाठी सक्षम प्लॅटफॉर्म निर्माण करण्यासाठी कटिबद्ध आहे. ठरए सोबतची भागीदारी आमच्या प्रयत्नांना नवी दिशा आणि वेग देत आहे.

# राज्यस्तरीय राजपूत युवक-युवती परिचय संमेलन थाटात संपन्न

■ **महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. २१ :** अखिल भारतीय क्षत्रिय महासभा आणि महाराणा प्रताप सेवा समिती, अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ४ थे राज्यस्तरीय क्षत्रिय राजपूत युवक-युवती परिचय संमेलन रविवारी, १६ नोव्हेंबर रोजी शहरातील प्रमिला ताई ओक हॉल येथे उत्साहात पार पडले. राज्यभरातून आलेल्या सुमारे ३०० युवक-युवतींनी या संमेलनास उत्स्फूर्त प्रतिसाद देत सहभाग नोंदविला.

या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून खासदार अनुप धोत्रे, आमदार रणधीर सावरकर, अखिल भारतीय क्षत्रिय महासभेचे वरिष्ठ महामंत्री राघवेंद्र सिंह राजू, प्रदेशाध्यक्ष राजेंद्र सिंह राजपूत, राणा दिलीपकुमार सानंदा, पंकजसिंह ठाकूर, दिलीपसिंह ठाकूर, दर्शनसिंह ठाकूर, डॉ. अजय चौहान, ॲड. शेखर परमार, ॲड. सुभाष ठाकूर, डॉ. सागर बैस तसेच अनेक मान्यवर उपस्थित होते.





समाजातील तरुण-तरुणींना विवाहासाठी योग्य जोडीदार मिळावा आणि समाजातील एकोपा वृद्धिंगत व्हावा या उद्देशाने या परिचय संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला उपस्थित राहिलेल्या सर्व मान्यवरांचे आयोजन समितीचे अध्यक्ष पृथ्वीराजसिंह ठाकूर यांनी मनःपूर्वक आभार व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संजयसिंह ठाकूर (जानकी), चंदनसिंह ठाकूर, लक्ष्मणसिंह ठाकूर, भोजराजसिंह ठाकूर, विजयसिंह तंवर, प्रविणसिंह गौर, विजयसिंह बैस, प्रदीपसिंह ठाकूर, राहू ठाकूर, ॲड. चेतनसिंह ठाकूर, अश्विन बैस, शामसिंह (ऑटो पार्ट्स), विजयसिंह गौर (मुन्ना), धम्मू ठाकूर, के. एन. सिंह, राजू ठाकूर (केळीवेली), सुरजसिंह चौहान (नुतन हिंदी), अजयसिंह गौतम, अजय परमार, प्रविणसिंह चौहान, गिरीधरसिंह, चंद्रशेखरसिंह ठाकूर, शामसिंह ठाकूर अनिकट, रवि ठाकूर, समीर प्रमोदसिंह कुशवाह, गुरुचरणसिंह, पवन ठाकूर (करणी सेना), मुन्ना ठाकूर गणेश, संदीपसिंह, राजकमलसिंह, धीरजसिंह गौतम, देवेन्द्रसिंह ठाकूर, सुंदरसिंह ठाकूर, शिवपालसिंह ठाकूर, मदनसिंह ठाकूर, धर्मसिंह ठाकूर, बृजमोहनसिंह ठाकूर, योगेशसिंह ठाकूर, मनोजसिंह ठाकूर, युवराजसिंह ठाकूर, अजयसिंह बघेल, विजयसिंह बघेल, विरेंद्रसिंह सिसोदिया, राहुल गौर, गोविंदसिंह गहिलोद, आशीषसिंह गहिलोद, राम ठाकूर, समीरसिंह गौतम, अजयसिंह ठाकूर (कोलखेड़), संजयसिंह ठाकूर, दीपकसिंह बिसेन, अजयसिंह (उ.ळ. चॅनल), सतीशसिंह गौर, महेंद्रसिंह सोमनवंशी, बहादूरसिंह ठाकूर, गिरधरसिंह बैस, अंकितसिंह ठाकूर, मदनसिंह ठाकूर (बालापूर), आकाशसिंह ठाकूर (बालापूर) यांनी मोलाचे योगदान दिले. युवक-युवतींचा सकारात्मक प्रतिसाद यामुळे संमेलनाला उत्साहाचे व रंगतदार वलय लाभले.

### महिला मंडळीचा ही उत्स्फूर्त सहभाग

या कार्यक्रमात चंदा ठाकूर, ललीता चौहान, विद्या बनाफर, रितु बैस, धनवंती ठाकूर, मिना बैस, मोना रघुवंशी, पुनम परमार, प्रिती ठाकूर, मोना चंद्रवंशी, कु. सोनीया ठाकूर, कल्पना चौहान, कल्पना पवार, प्रिती पवार, शैला चौहान, माधुरी ठाकूर, रश्मी ठाकूर, निशा ठाकूर, सपना ठाकूर, मृदुला गौर, रेखा ठाकूर, उर्मिला राजपुत, उमा ठाकूर, निर्मला ठाकूर, संगिता बघेल, दिपीका ठाकूर, अनिता बैस, कल्पना ठाकूर, सरला गौर, अनिता बैस, प्राची ठाकूर, निर्जला बैस, प्रिती ठाकूर, ज्योती गौर, कल्पना सोलंकी, सपना राजपूत, कलावती ठाकूर, कंचन पवार, पुनम चौहान फुलवा गौर, बेबी बैस, सुषमा चौहान, अन्नपुर्णा चौहान, विजया राजपुत, अर्चना गौतम,रोशनी बिसेन, तेजल गौतम, पुनम गौतम, संगीता तंवर, नेहा तंवर, शिल्पा चौहान, शितल चौहान, माधुरी चौहान, विजया चौहान, निलीमा चौहान, मालाबाई बैस, सोनिया गौतम, सुमनबाई ठाकूर, मिना बैस, योगिता बैस, स्वाती पवार, संगीता चौहान, शितल चौहान, फुलवा गौर, बेबी बैस, सुषमा चौहान, अन्नपुर्णा चौहान, विजया राजपुत, अर्चना गौतम, रोशनी बिसेन यांचा सक्रिय सहभाग होता.

### पनवेलच्या पटेल हॉस्पिटलमध्ये रोजा रोबोटद्वारे
## गुडघा प्रत्यारोपण शस्त्रक्रिया पूर्ण

■ **महासागर प्रतिनिधी, पनवेल, दि. २१ :** पनवेल शहरातील पटेल हॉस्पिटल मध्ये डॉ. कुणाल मखिजा यांनी रोजा रोबोटद्वारे 500 गुडघा प्रत्यारोपण शस्त्रक्रिया गेल्या दोन वर्षात पूर्ण केल्या आहेत. पटेल हॉस्पिटल पनवेल हे रोजा रोबोटिक द्वारा गुडघ्याची 500 सर्जरी करणारा महाराष्ट्र मधला पहिला हॉस्पिटल झाला आहे. सव्वा पाचशे ते साडेपाचशे लोकांनी आतापर्यंत याचा लाभ घेतला आहे.

रोबोट सर्जरी मध्ये लोकांचा फायदा असा होतो की स्नायू न कापता आणि लिगामेंट ना कापता गुडघ्याचं ऑपरेशन (नी रिप्लेसमेंट) करता येतो. शस्त्रक्रिया करताना रोजा रोबोट 0.5 मिलिमीटर आणि 0.5 डिग्री परफेक्शननी ऑपरेशन करू शकतो. ज्याचा फायदा रुग्णाला होतो. ज्यामुळे रुग्ण त्याच दिवशी चालायला लागतो. रुग्णाचा पाय खूप जास्त वाकतो. हॉस्पिटलमध्ये कमी दिवस राहावा लागतो. रुग्ण पहिल्या किंवा दुसऱ्या दिवशी घरी जातो तेव्हा तो चालत घरी जातो. आणि घरी सुद्धा पंधरा-वीस दिवसांनी लवकरच नॉर्मल लाईफ मध्ये येऊन जातो. याला इंजेक्शन कमी लागतात. गोळ्या कमी लागतात. हॉस्पिटलमध्ये कमी दिवस द्यावा लागतात. या रोबोट सर्जरीत वयाची समस्या नाही, शस्त्रक्रिया 35 वर्षाच्या माणसांमध्ये पण करू शकतो आणि पटेल हॉस्पिटलमध्ये रोबोट शस्त्रक्रिया 93 वर्षाच्या रुग्णामध्ये सुद्धा केला आहे.




ही शस्त्रक्रिया 70, 80, 90 किलोमध्ये पण करू शकतो आणि 120 ते 140 किलो वजनाच्या रुग्णावर पटेल हॉस्पिटलमध्ये शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. गुडघ्याची शस्त्रक्रिया खूपच कॉमन झाला आहे. पटेल हॉस्पिटल मध्ये पनवेलमधील ग्रामीण विभागातून रुग्ण गुडघ्याच्या रोबोटिक सर्जरीसाठी आले आहेत. रुग्णालयात रोबोटिक सर्जरीसाठी पेण, रायगड, थला, मंडणगड, म्हसळा, सांगली, सांगोला, विटा, सोलापूर, पंढरपूर, कोल्हापूर, युपी, बिहार, दुबई आणि बांगलादेशहुन रुग्ण आले आहेत. शस्त्रक्रिया झालेले सगळेच रुग्ण प्रसन्न आहेत. कारण याचे रिझल्ट खूपच चांगले आहेत. ही शस्त्रक्रिया सामान्य माणसाला सुद्धा परवडते. कारण ही शस्त्रक्रिया इन्शुरन्स मध्ये पण कव्हर होतो आणि सामान्य माणसाला जे नॉर्मल गुडघ्याची प्रत्यारोपण आहे तेवढेच पैसे घेत असून रोबोटचे वेगळे एक्स्ट्रा पैसे चार्ज करत नसल्याचे डॉक्टर कुणाल माखिजा यांनी सांगितले.

## तेल्हारा नगरपरिषद निवडणूक नगराध्यक्ष पदासाठी पाच उमेदवार तर नगरसेवक पदाकरिता ९८ उमेदवार

**तेल्हारा :** तेल्हारा नगर परिषदेच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्जमागे घेतल्यानंतर न.प.अध्यक्ष पदासाठी पाच अर्ज तर नगरसेवक पदाकरिता ९८ अर्ज राहिले. अध्यक्षपदासाठी शिवानी सचिन थाटे, राजकन्या मधुकर पवार, वैशाली जितेंद्र पालीवाल, विद्या सिद्धार्थ शामस्कार, दीपा महेश सिसोदिया यांच्यामध्ये लढत असून नगरसेवक पदासाठी ९८ उमेदवार रिंगणात आहेत २६ नोव्हेंबरला उमेदवारांना चिन्हाचे वाटप करण्यात येईल. त्यानंतर निवडणुकीची खरे चित्र स्पष्ट होणार आहे.

# अकोला जिल्ह्यात तुरीच्या वाहीत अज्ञात महिलेचे अर्धवट जळालेले प्रेत आढळले



**अकोला :** अकोला जिल्ह्यातील बाळापुर पोलीस ठाण्याच्या हद्दीत धनेगाव येथील गजानन लांडे यांच्या शेतातील तुरीच्या वाहीत २० नोव्हेंबर २०२५ रोजी एका अज्ञात महिलेचे अर्धवट जळालेले प्रेत आढळून आले असून याबाबत पोस्टे बाळापुर येथे ७२/२०२५, कलम १९४ BNS प्रमाणे मर्ग दाखल करण्यात आला आहे. मृत महिलेचे वय अंदाजे २० ते ३० वर्ष असून तिच्या उजव्या हाताच्या मनगटावर 'तळीहरश्र' असे गोंदलेले व मोरपंखाचा टॅटू, काळे केस, सडपातळ बांधा, सावळा वर्ण, हात-पाय अर्धवट तसेच चेहरा पूर्णतः जळालेला, कानात डायमंडची रिंग व गळ्यात मंगळसूत्रासारखी चैन आढळली आहे. नमूद वर्णनाची महिला मिसिंग असल्यास किंवा मृत महिलेची ओळख पटवण्यास मदत होईल अशी कोणतीही माहिती असल्यास तात्काळ पोलीस स्टेशन बाळापुर येथे किंवा पोनि शंकर शेळके (९९२१०३८१११), PI प्रकाश झोडगे (९६५७००९७२७), अझख विजय चव्हाण (९९२३३८८७९८) व PSI गोपाल जाधव (९१३००९६४४९) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन अकोला पोलीसांनी केले आहे.

### लघु, मध्यम उद्योजकांसाठी सेंट्रल बँकेचा कर्ज महामेळावा; कर्ज मंजुरीपत्रांचे वितरण

# उद्योजकांना पाठबळ मिळण्यासाठी उपयुक्त उपक्रम : खा. अनुप धोत्रे

**▪अकोला,दि २१ (प्रतिनिधी) :**

जिल्ह्याची अग्रणी बँक असलेल्या सेंट्रल बँक ऑफ इंडियातर्फे लघु, मध्यम उद्योजकांसाठी कर्ज महामेळावा खासदार अनुप धोत्रे यांच्या उपस्थितीत आज झाला. छोट्या उद्योजकांना आर्थिक बळ मिळवून देण्यासाठी हा उपक्रम उपयुक्त ठरेल, असा विश्वास खासदार श्री. धोत्रे यांनी यावेळी व्यक्त केला.

औद्योगिक वसाहतीतील अकोला इंडस्ट्रीयल असोसिएशनच्या सभागृहात मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. खासदार श्री. धोत्रे यांनी उपस्थित राहून बँकेच्या उपक्रमांचे कौतुक केले. असोसिएशनचे अध्यक्ष मनोज खंडेलवाल, बँकेच्या सहायक महाव्यवस्थापक बिनिता राणी, विभागीय प्रमुख पंकज कुमार, जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक नयन सिन्हा व आरबीआयचे पीयुष अग्रवाल उपस्थित होते.

या उपक्रमाच्या माध्यमातून जिल्ह्यातील उद्योग, उद्योजक व सूक्ष्म-मध्यम व्यवसायांना मोठ्या प्रमाणावर आर्थिक पाठबळ दिले जाईल, असे पंकज कुमार यांनी यावेळी सांगितले.कार्यक्रमात ग्राहक संवाद उपक्रमाचेही आयोजन करण्यात आले. मुख्य व्यवस्थापक सचिन डोके यांनी उद्योजकांशी संवाद साधत त्यांच्या आर्थिक गरजांचा आढावा घेण्यात आला. पात्र लाभार्थ्यांना विविध कर्ज योजनांअंतर्गत मंजुरीपत्रांचे वितरण करण्यात आले.




सें. बिझनेस योजना, सें. जीएसटी योजना, सें. हॉटेल योजना, सें. संजीवनी योजना, सीएमईजीपी, कर्जवितरण व इतर बँकांच्या योजनांची माहिती उपस्थितांना देण्यात आली. व्यापारी, उद्योगपती आणि बँक कर्मचाऱ्यांच्या सक्रिय सहभागामुळे कार्यक्रमाला चांगला प्रतिसाद मिळाला.

## राष्ट्रीय अन्नसुरक्षा अभियानात प्रमाणित हरभरा बियाणे वितरण

**▪अकोला,दि २१ (प्रतिनिधी) :**

शेतकऱ्यांना दर्जेदार प्रमाणित बियाणे अनुदानित दरावर उपलब्ध व्हावे कडधान्य पिकांच्या नवीन वाणाचा प्रचार प्रसार व्हावा व शेतकऱ्यांना अवलंब करण्यास प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने राष्ट्रीय अन्न व पोषण सुरक्षा अभियान कडधान्य व नवीन बियाणे अर्थसहाय्य सन २०२५-२६ अंतर्गत प्रमाणित बियाणे वितरण हरभरा (१० वर्षाआतील) बियाणे रु.५००० प्रति क्वि. (क्षेत्र ०.२० ते २.०० हे. ) मर्यादेत वितरित करण्यात येत आहे.हरभरा या पिकाच्या अनुदान तत्वावर बियाणे लाभ मिळण्याकरिता सातबारा व फार्मर आयडीसह प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य (ऋउऋड) या तत्वावर जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी शंकर किरवे यांनी केले आहे. अधिक माहितीकरिता कृषि विभागाच्या कृषि सहायक, कृषि पर्यवेक्षक व मंडळ कृषि अधिकारी व तालुका कृषि अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा.

## ७ वर्षीय मुलीचा विनयभंग प्रकरणी आरोपीला त्वरीत अटक

**▪अकोला,दि २१ (प्रतिनिधी) :**

हकीकत अशा प्रकारे आहे की, पो.स्टे डाबकी रोड अकोला येथे दिनांक २०.११.२०२५ रोजी फिर्यादी सौ. अ.ब.क रा. कामगार कल्याण केंद्रा जवळ, डाबकी रोड, अकोला यांनी फिर्याद दिली की, त्यांचा भाउ आरोपी सुनिल त्रबंक गवई वय ४५ वर्ष रा. कामगार कल्याण केंद्रा जवळ, डाबकी रोड, अकोला असे एकत्र राहत असुन दिनांक १९/११/२५ रोजी १७/०० वाजता फिर्यादी हया घरी नसतांना यातील नमुद आरोपीने वाईट उद्देशाने त्यांचे मुलीच्या पप्या घेवुन विनयभंग केला. अशा दिलेल्या फिर्याद वरून अप क्र. ३५७/२५ कलम ७५ (१), (एक) बिएनएस सह कलम ८, १२ पोस्को ॲक्ट प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.असुन सदर गुन्हयातील आरोपी नामे सुनिल त्रबंक गवई वय ४५ वर्ष रा. कामगार कल्याण केंद्रा जवळ,डाबकी रोड, अकोला याचा जलदगतीने शोध घेवुन त्यास अटक करण्यात आली आहे. सदर कार्यवाही मा. पोलीस अधिक्षक श्री अर्चित चांडक साहेब, मा. अपर पोलीस अधिक्षक श्री बी. चंद्रकांत रेडडी, मा. उपविभागीय अधिकारी श्री सुदर्शन पाटील यांचे मार्गदर्शनामध्ये पोलीस निरीक्षक श्री. दिपक कोळी, पोउपनि अनिल चव्हाण पोलीस अंमलदार मंगेश इंगळे, दिपक तायडे प्रविण इंगळे, राजेश ठाकुर, मंगेश गिते, पो.स्टे डाबकी रोड, यांनी केली

## ऑपरेशन प्रहारमध्ये माना पोलिसांची धडाकेबाज कारवाई

**▪अकोला,दि २१ (प्रतिनिधी) :**

मुर्तीजापूर तालुक्यातील माना परिसरात अवैध दारूविक्रीवर धडक देत माना पोलिसांनी २० नोव्हेंबर रोजी ऑपरेशन प्रहारङ्ग अंतर्गत सहा ठिकाणी मोठी मोहीम राबवली. पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या मार्गदर्शनातील या कारवाईत अवैधरित्या गावठी हातभट्टी व देशी दारू विक्री करणाऱ्या सहा जणांना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्या जवळून ७४,९५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

अतुल रामदास इंगळे (३२ बॉटल), उत्तम मेश्राम (१४), जीवनकला शिरसाट (११), सचिन हुमणे (२२), सुधीर जयस्वाल (१५) व मोहन सरदार (सुमारे ३४० लिटर सळवा मोहमास) यांच्यावर दारूबंदी कायद्यांतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.जनतेच्या



सुरक्षेसाठी पोलीस सदैव सज्ज असून, अवैध धंद्यांवर कठोर कारवाई सुरूच राहील.

## न्यू तापडिया नगरात बिबट्याचा कहर; घरात घुसून काच फोडत पळाला

**अकोला :** अकोला शहरातील न्यू तापडिया नगर परिसरात आज सकाळी बिबट्याने धुमाकूळ घातल्याने नागरिकांमध्ये एकच गोंधळ उडाला आहे. सकाळी सुमारे नऊच्या सुमारास पोलीस कर्मचारी विलास बंकावार यांच्या घरात बिबट्याने काच फोडून उडी मारल्याचा धक्कादायक प्रकार घडला.मिळालेल्या माहितीनुसार, बंकावार यांच्या सासू घरातील पायरीवरून वर जात असताना त्यांना पायरीतच बिबट झोपलेल्या अवस्थेत दिसला. महिलेची चाहूल लागताच बिबट्याने अचानक उसळी मारत थेट काच फोडून घराबाहेर पळ काढला. सुदैवाने या संपूर्ण प्रकारात कोणतीही जीवितहानी झालेली नाही.अचानक घडलेल्या या प्रकारामुळे परिसरातील रहिवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. दरम्यान, नागरिकांनी वनविभागाने तातडीने लक्ष घालून बिबट्याचा शोध घेण्यासाठी आवश्यक पावले उचलावीत, अशी मागणी जोर धरू लागली आहे.दरम्यान, वन विभाग कडून अद्यापही घटनेची पुष्टी करण्यात आलेली नाही, हे येथे उल्लेखनीय.पोलीस कर्मचारी विलास बंकावार यांच्या घरात बिबट घुसल्याची घटना बिबटाने काच फोडून घराबाहेर पळ काढलामहिलेची चाहूल लागताच बिबट अचानक धावला.

## राज्यांतर्गत अन्नधान्य,कडधान्य व गळीतधान्य पिकांच्या पिकस्पर्धा

**▪अकोला,दि २१ (प्रतिनिधी) :**

राज्यामध्ये पिकाची उत्पादकता वाढविण्यासाठी विविध भागांमध्ये शेतक-यांकडून विविध प्रयोग करण्यात येतात व उत्पादकतेत वाढ करण्यात येते. अशा प्रयोगशील शेतक-यांना मिळालेल्या उत्पादकतेबाबत प्रोत्साहन देऊन गौरव केल्यास त्यांची इच्छा मनोबलामध्ये वाढ होऊन आणखी उमेदीने नवनवीन अद्यायावत तंत्रज्ञानाचा वापर केला जाईल. यामुळे कृषि उत्पादनामध्ये भर घालण्यासाठी शेतक-यांचे योगदान मिळेल, तसेच त्यांचे मार्गदर्शन परीसरातील इतर शेतक-यांना होऊन राज्याच्या एकूण उत्पादनात मोलाची भर पडेल, हा उद्देश ठेऊन राज्यांतर्गत पीकस्पर्धा योजना राबविण्यात येत आहे.शासन निर्णय क्र. पीकस्पर्धा -२०२०/प्र.क्र.११३/४ए, दि.२० जुलै २०२३ अन्वये रब्बी हंगाम २०२५ मध्येही पिकस्पर्धा मागील वर्षाप्रमाणे तालुका, जिल्हा व राज्य पातळीवर राबविण्यात येत आहेत. त्यानुसार कृषी विभागामार्फत रब्बी हंगाम सन २०२५ मध्ये सर्वसाधारण व आदिवासी गटासाठी ज्वारी, गहू, हरभरा, करडई व जवस या ५ पिकासाठी पिकस्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे.उपरोक्त नमूद पिकांच्या क्षेत्रात आणि उत्पादनात वाढ व्हावी याकरीता जास्तीतजास्त शेतकऱ्यांनी पिक स्पर्धेत सहभागी व्हावे ,असे आवाहन कृषी विभागामार्फत करण्यात येत आहे. पिकस्पर्धेबाबत अधिक माहितीसाठी शेतकरी बंधूभगीनींनी संबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी साधावा ,तसेच महाराष्ट्र शासन कृषी विभागाचे संकेतस्थळ htt://krishi. maharashtra.gov.in ला भेट द्यावी .

## आज रामदेवबाबा-श्यामबाबा मंदिरात रामदेव भजन संध्या

**▪अकोला,दि २१ (प्रतिनिधी) :**

स्थानिक गीता नगर परिसरात असलेल्या रामदेवबाबा श्यामबाबा मंदिरात रामदेव भजन संध्या व दिव्य ज्योत दर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे.रामदेवबाबा श्यामबाबा सेवा समितीच्या वतीने आज मार्गशीर्ष शुद्ध द्वितीया, शनिवार दिनांक २२ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ७ वाजता या भजन संध्याचे आयोजन करण्यात आले आहे.या संगीतमय भजन संध्येत भजन गायिका सौ. पुष्पा मंत्री, सौ. सोनल चितलांगे आणि सौ. दिपाली जाजू या राम देवबाबांचे भक्तिगीत सादर करतील.

या भजन उत्सवात भक्तांसाठी दिव्य ज्योत दर्शनाचीही सुव्यवस्था करण्यात आली असून भक्तांना दर्शन आणि पूजनाची संधी उपलब्ध करण्यात येणार आहे. महिला व पुरुष भक्तांनी या दिव्य संगीतमय भजन संध्येला मोठ्या संख्येने उपस्थित राहून लाभ घेण्याचे आवाहन रामदेवबाबा- श्यामबाबा सेवा समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# आस्थापनांनी महिला तक्रार निवारण समिती गठित करावी

## जिल्हा महिला व बालविकास अधिकाऱ्यांचे आवाहन

**▪अकोला,दि २१ (प्रतिनिधी) :**

कामाच्या ठिकाणी लैंगिक छळवणुकीस प्रतिबंध कायद्यानुसार, १० किंवा १० पेक्षा अधिक कर्मचारी असलेल्या प्रत्येक आस्थापनेमध्ये महिला तक्रार निवारण समिती असणे आवश्यक आहे. त्यामुळे सर्व शासकीय, निमशासकीय, सार्वजनिक, खासगी आस्थापनांनी अशा समितीचे गठन करण्याचे आवाहन जिल्हा महिला व बालविकास अधिकारी गिरीश पुसदकर यांनी केले आहे.

शासकीय, निमशासकीय कार्यालय, संघटना, महामंडळे, आस्थापना, स्थानिक प्राधिकरण किंवा शासकीय कंपनी किंवा नगरपरिषद किंवा सहकारी संस्था अशा सर्व आस्थापना, तसेच कोणतेही खाजगी क्षेत्र, संघटना किंवा खाजगी उपक्रम/संस्था, एंटरप्रायजेस, अशासकीय संघटना, पुरवठा, वितरण व विक्री यासह वाणिज्य, व्यावसायिक, शैक्षणिक, करमणूक, औद्योगिक, आरोग्यसेवा किंवा वित्तीय कामकाज पार पाडणारे युनिट किंवा सेवा पुरवठादार, सोसायटी, ट्रस्ट,उत्पादक, रुग्णालये, शुश्रुषालये, क्रिडा संस्था,प्रेक्षागृहे, क्रीडा संकुले आदी ठिकाणी किंवा अधिनियमात नमूद केलेल्या कामाच्या शासकीय व खाजगी क्षेत्रातील कार्यालयाच्या ठिकाणी शासन निर्णयाप्रमाणे अंतर्गत तक्रार समिती गठित करणे बंधनकारक आहे.

अधिनियम कलम २६ मध्ये जर एखाद्या मालकाने अंतर्गत तक्रार समिती स्थापन केली नाही आणि कायद्यातील व नियमातील विविध तरतुदींचे व जबाबदाऱ्यांचे पालन न केल्यास म ालकाला ५० हजार रुपयापर्यंत दंड होईल. दुस-यांदा आढळल्यास परवाना रद्द, दुप्पट दंड अशी तरतूद आहे. समितीची तीन वर्षांची मुदत संपली असेल तर समिती पुनर्गठित करावी.या समितीची नोंद केंद्र शासनाच्या शी बॉक्स पोर्टलवर (shebox. wcd.gov.in) करावी. जिल्ह्यातील सर्व आस्थापनांनी तक्रार समिती गठित करुन तसा अहवाल जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय येथे पाठवावा, असे आवाहन श्री. पुसदकर यांनी केले आहे.


महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

## ई निविदा प्रकाशनाची सूचना

महानिर्मिती, औ.वि. केंद्र परळी- वै. कडून अनुभवी व नामांकित उत्पादक/ पुरवठादार / कंत्राटदारा कडून खालील काम / वस्तूंचा पुरवठा करण्यासाठी ई-निविदा मागविण्यात येत आहेत.


| ई-निविदा क्रमांक | विषय | अंदाजित रक्कम /बयना रक्कम | ई-निविदा विक्रीचा कालावधी | ई-निविदा स्वीकृत (१२.00 पर्यंत) |
|---|---|---|---|---|
| ई-निविदा क्र ३०००06३४८९ (आर) | वर्क ऑफ मेंटेनेंस ऑफ एफके6डी३० बॉयलर फीड पंप अँड देअर वॉल्वज ड्यूरिंग सीओएच अॅट टीएम-२, २५०मे.वॅट टीपीएस, परळी वै. | ५.९३ लाख ९४३८/- | २२.११.२०२५ ते २९.११.२०२५ | ३०.११.२०२५ |
| ई-निविदा क्र ३००००६३४९२ (आर) | प्रॉक्यूरमेंट ऑफ जीआय शीट्स रीक्वायर्ड इन एओएच अॅट बीएम यू-८, टीपीएस, परळी वै. | १०.८० लाख १४३००/- | २२.११.२०२५ ते २९.११.२०२५ | ३०.११.२०२५ |
| ई-निविदा क्र ३००००६३४९१ (आर) | प्रॉक्यूरमेंट ऑफ ड्रम, एमएस,सीआरएच अँड एचआरएच सेफ्टी वॉल्वस स्पेअर्स रीक्वायर्ड इन एओएच अॅट बीएम यूनिट ८,२५० मे. वॅट, टीपीएस, परळी वै. | ११.३६ लाख १४८६१/- | २२.११.२०२५ ते ०२.१२.२०२५ | ०३.१२.२०२५ |
| ई-निविदा क्र ३००००६३१७७ (आर) | एएमसी फॉर वर्क ऑफ व्हेरियस एचपी वॉल्वज सर्विसिंग, एचपी वेल्डिंग वर्क अँड ऑन-लाइन लिकेजेस अटेंडिंग ऑफ एचपी वॉल्वज इन यू-८, बीएम, २५० मे. वॅट , टीपीएस, परळी वै. | १५.७१ लाख १९२१९/- | २२.११.२०२५ ते ०७.१२.२०२५ | ०८.१२.२०२५ |
| ई-निविदा क्र ३००००६३१९९ (आर) | वन ईयर एएमसी ऑफ फायर डेटेक्शन सिस्टिम ऑफ यू-६अँड७ अॅट आय अँड सी-१, २५० मे.वॅट टीपीएस, परळी वै. | १०.६४ लाख १४१५०/- | २२.११.२०२५ ते ०७.१२.२०२५ | ०८.१२.२०२५ |
| ई-निविदा क्र ३००००६३३७६ (आर) | वर्क ऑफ सर्विसिंग ऑफ बॉयलर ड्रम इंटरनल्स ऑफ यू-७ अॅट बीएम-१, २५०मे.वॅट टीपीएस, परळी वै. | ४.१४ लाख ७६४१/- | २२.११.२०२५ ते ०७.१२.२०२५ | ०८.१२.२०२५ |
| ई-निविदा क्र ३००००६३४७९ (आर) | वर्क ऑफ यूटीपी अँड ओएफसी केबल लेईंग अँड टर्मिनेशन अॅट आयटी डिपार्टमेंट (एमआयएस) ऑफ टीपीएस, परळी वै. | १२.७४ लाख १६२४७/- | २२.११.२०२५ ते ०७.१२.२०२५ | ०८.१२.२०२५ |
| ई-निविदा क्र ३००००६२३३८ | एएमसी ऑफ सीआय / प्रीमियर पाइप लाइन वर्क अॅट कॉलनी प्रिमायसेस टीपीएस, परळी वै. | २९.२६ लाख ३२७६९/- | २२.११.२०२५ ते १३.१२.२०२५ | १४.१२.२०२५ |
| ई-निविदा क्र ३००००६२९३८ | प्रॉक्यूरमेंट ऑफ आरपीएम इंडिकेटर अँड स्पीड सेन्सॉर अॅट आय अँड सी-१, २५०मे.वॅट टीपीएस, परळी वै. | ४.८९ लाख ८३९५/- | २२.११.२०२५ ते १३.१२.२०२५ | १४.१२.२०२५ |
| ई-निविदा क्र ३००००६३००३ | प्रॉक्यूरमेंट ऑफ पॉवर कॉंट्रॅक्टर अँड डीपी स्वीचेस ड्यूरिंग एओएच ऑफ यू-७, अॅट एएचपी-१, टीपीएस, परळी वै. | २.२० लाख ५७०३/- | २२.११.२०२५ ते १३.१२.२०२५ | १४.१२.२०२५ |
| ई-निविदा क्र ३००००६३०१५ | प्रॉक्यूरमेंट ऑफ व्हेरियस साइज फास्टनर्स फॉर एओएच ऑफ यू-७ अॅट एएचपी-१, टीपीएस, परळी वै. | ३.०४ लाख ६५४८/- | २२.११.२०२५ ते १३.१२.२०२५ | १४.१२.२०२५ |
| ई-निविदा क्र ३००००६३०४२ | प्रॉक्यूरमेंट ऑफ लुब ऑइल फिल्टर्स फॉर ऑइल कोल मिल अँड फॅन्स लुब ऑइल सिस्टम अॅट बीएम-१, २५०मे.वॅट टीपीएस, परळी वै. | ७.४५ लाख १०९६०/- | २२.११.२०२५ ते १३.१२.२०२५ | १४.१२.२०२५ |
| ई-निविदा क्र ३००००६३०५१ | टू इयर ॲन्युअल वर्क कॉंट्रॅक्ट फॉर मेंटेनेंस ऑफ हायड्रोलिक सिस्टिम इंस्टॉलड अॅट सीएचपी-२, २५०मे.वॅट टीपीएस, परळी वै. | ६१.१४ लाख ६४६४४/- | २२.११.२०२५ ते १३.१२.२०२५ | १४.१२.२०२५ |
| ई-निविदा क्र ३००००६३११९ | वर्क ऑफ जॉइंट रीपेरिंग ऑन पीआरडीएस लाइन विथ एचपी वेल्डिंग, स्ट्रैस रेलीविंग अँड एक्स-रे , रिप्लेसमेंट ऑफ सूट ब्लोवर गाइड पाइप ड्यूरिंग यू-७ एओएच अॅट बीएम-१, २५०मे.वॅट टीपीएस, परळी वै. | २२.३६लाख २५८६५/- | २२.११.२०२५ ते १३.१२.२०२५ | १४.१२.२०२५ |
| ई-निविदा क्र ३००००६३१२२ | वर्क ऑफ रीपेयर ऑफ वेंट लाइन अँड सेफ्टी वॉल्व ड्रेन पॅन(ट्रे) ऑफ यू-७ इन एओएच अॅट बीएम-१, २५०मे.वॅट टीपीएस, परळी वै. | २.२०लाख ५७०९/- | २२.११.२०२५ ते १३.१२.२०२५ | १४.१२.२०२५ |
| ई-निविदा क्र ३००००६३१४८ | प्रॉक्यूरमेंट ऑफ स्पेयर्स फॉर पीए फॅन बीएचईएल एनडीव्ही २२बीएबी २ आयजीव्ही स्पेयर्स अॅट बीएम-१, २५०मे.वॅट टीपीएस, परळी वै. | ८.७१लाख १२२१८/- | २२.११.२०२५ ते १३.१२.२०२५ | १४.१२.२०२५ |
| ई-निविदा क्र ३००००६३१४९ | प्रॉक्यूरमेंट ऑफ ॲक्सेस हाय टाइप डोर असेम्ब्ली फॉर एपीएच, हॉट एयर डक्ट अँड कोल मिल अॅट बीएम-१, २५०मे.वॅट टीपीएस, परळी वै. | ४.३९लाख ७८९४/- | २२.११.२०२५ ते १३.१२.२०२५ | १४.१२.२०२५ |
| ई-निविदा क्र ३००००६३१५० | वर्क ऑफ अटेंडिंग लिकेज बाय रिप्लेसिंग अनसेफ डॅमेजड प्लेटस / पॅचिंग ऑफ पीए, एसए, कोल मिल हॉट एयर व्हर्टीकल डक्ट , कॉमन हॉट एयर डक्ट, कोल्ड एयर डक्ट अँड ॲश क्लिनिंग फ्रॉम एसए , पीए अँड बायपास डक्टस ड्यूरिंग शॉर्ट शट डाउन / ॲज अँड व्हेन रीक्वायर्ड ऑफ यू-६ अँड ७ अॅट बीएम-१, २५०मे.वॅट टीपीएस, परळी वै. | ४.५२ लाख ८०२४/- | २२.११.२०२५ ते १३.१२.२०२५ | १४.१२.२०२५ |
| ई-निविदा क्र ३००००६३१९० | एएमसी फॉर द वर्क ऑफ ऑनलाइन स्टीम लिकेज अटेंडिंग, नॉन एक्स-रे एचपी वेल्डिंग इन यू-६ अँड ७ अॅट बीएम-१, २५०मे.वॅट टीपीएस, परळी वै. | २०.२३ लाख २३७३६/- | २२.११.२०२५ ते १३.१२.२०२५ | १४.१२.२०२५ |
| ई-निविदा क्र ३००००६३१९३ | वर्क ऑफ रेक्टिफिकेशन ऑफ अनसेफ कंडिशन्स ऑफ बॉयलर्स अॅट बीएम-१, २५०मे.वॅट टीपीएस, परळी वै. | ३.५६ लाख ७०६५/- | २२.११.२०२५ ते १३.१२.२०२५ | १४.१२.२०२५ |
| ई-निविदा क्र ३००००६३१९४ | वर्क ऑफ एचपी वॉल्व सर्विसिंग, स्टीम ट्रकिंग लाइन्स रीपेरिंग ड्यूरिंग यू-७ एओएच अॅट बीएम-१, २५०मे.वॅट टीपीएस, परळी वै. | ९.११ लाख १२६१८/- | २२.११.२०२५ ते १३.१२.२०२५ | १४.१२.२०२५ |
| ई-निविदा क्र ३००००६३१९५ | वर्क ऑफ बॉयलर ट्यूब थिकनेस्स सर्वे इन यू-७ ओवरहौल अॅट बीएम-१, २५०मे.वॅट टीपीएस, परळी वै. | १.९७ लाख ५४७१/- | २२.११.२०२५ ते १३.१२.२०२५ | १४.१२.२०२५ |
| ई-निविदा क्र ३००००६३१९६ | वर्क ऑफ ओएचपी ड्यूरिंग यू-७, एओएच अॅट बीएम-१, २५०मे.वॅट टीपीएस, परळी वै. | १.७३ लाख ५२१२/- | २२.११.२०२५ ते १३.१२.२०२५ | १४.१२.२०२५ |
| ई-निविदा क्र ३००००६३२२१ | टू ईयर एएमसी फॉर प्रोव्हायडिंग सर्विसेस फॉर कॉम्पुटर एडेड ऑफिशियल वर्क इन यू-८, टीएम, २५०मे.वॅट टीपीएस, परळी वै. | ११.७५ लाख १५२५४/- | २२.११.२०२५ ते १३.१२.२०२५ | १४.१२.२०२५ |
| ई-निविदा क्र ३००००६३२३९ | वर्क ऑफ रिप्लेसमेंट ऑफ प्लॅटफॉर्म ग्रिल्स, रेलिंगज अँड अदर अलाईड फॅब्रिकेशन वर्क रीक्वायर्ड अॅट बीएम-२, २५०मे.वॅट टीपीएस, परळी वै. | ३.१७ लाख ६६७३/- | २२.११.२०२५ ते १३.१२.२०२५ | १४.१२.२०२५ |
| ई-निविदा क्र ३००००६३३४१ | सप्लाय अँड इंस्टॉलेशन ऑफ डायव्हरटिंग प्लेट इन फ्लूए गॅस पाथ बिफोर ईएसपी, ड्यूरिंग ओवरहौल ऑफ यू-७ एओएच अॅट बीएम-१, २५०मे.वॅट टीपीएस, परळी वै. | २७.०० लाख ३०५०६/- | २२.११.२०२५ ते १३.१२.२०२५ | १४.१२.२०२५ |

वरील तारीखेस ई-निविदा विक्री सुरू होण्याची वेळ ११:०० व ई-निविदा विक्री बंद होण्याची वेळ १६:००, निविदा किंमत व बयाना रक्कम ऑनलाइन पद्धतीने भरावयाची आहे.सर्व निविदा करिता निविदा किंमत रु. ११८०/- (जीएसटी सह) संपर्क व्यक्ती: मुख्य अभियंता, टीपीएस परळी-वैजनाथ. मेल आय डि: parlitpsrp@mahagenco.in, cegenparli@mahagenco.in अधिक माहितीसाठी आणि विक्रेता नोंदणीसाठी आमच्या वेबसाईटला भेट द्याः https://eprocurement.mahagenco.in, SRM help desk E-mail ID etendering.prl@mahagenco.in एस.आर.एम. मदत लाईन क्रमांक ८४११९७१५२५

**मुख्य अभियंता**

## मुर्तिजापूर निवडणूक रंगात नगराध्यक्ष पदासाठी ८ तर नगरसेवक पदासाठी १६८ उमेदवार रिंगणात

**■मुर्तिजापुर,दि २१ (प्रतिनिधी) :** नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ चे अंतिम चित्र आता स्पष्ट झाले असून माघारीच्या टप्प्यानंतर राजकीय रंगत अधिकच वाढली आहे. उमेदवारी अर्जांची छाननी, नामंजुरी आणि शेवटच्या क्षणी झालेल्या माघारींमुळे संपूर्ण मुर्तिजापूर शहरात निवडणुकीची खरी रणधुमाळी सुरू झाली आहे.नगराध्यक्ष पदासाठी एकूण १२ अर्ज दाखल झाले होते. १८ नोव्हेंबर रोजी झालेल्या छाननीत १ अर्ज नामंजूर झाला. त्यानंतर २० नोव्हेंबरला एक आणि २१ नोव्हेंबरला आणखी एक उमेदवाराने माघार घेतली. याशिवाय एका उमेदवाराचा अर्ज दुबार असल्याने एक अर्ज मागे घेण्यात आला. त्यामुळे नगराध्यक्ष पदासाठी आता



एकूण ८ उमेदवार रिंगणात उरले असून ही लढत अधिकच चुरशीची झाली आहे.

नगरसेवक पदासाठी दाखल एकूण १८९ अर्जांपैकी छाननीत ११ अर्ज नामंजूर झाले. त्यानंतर १९ नोव्हेंबरला ४, २० नोव्हेंबरला ६, आणि २१ नोव्हेंबरला ११ असे एकूण २१ उमेदवारांनी माघार घेतली. यानंतर नगरसेवक पदासाठी १६८ उमेदवार अंतिम रिंगणात राहिले आहेत. काही वॉर्डांतील बहुकोनी स्पर्धा आता थेट द्विकोणी व तिकोणी स्वरूपात बदलली असून स्थानिक राजकारणात नवी मांडणी सुरू आहे.दरम्यान, निवडणूक निरीक्षकांचा सततचा दौरा, प्रशासनाची कडक देखरेख, उमेदवारांच्या हालचाली, पक्षीय गाठीभेटी या सर्व घडामोडींमुळे मुर्तिजापूरची निवडणूक अधिक तापली आहे. २ डिसेंबरला होणाऱ्या मतदानाकडे नागरिकांसह संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले असून माघारीनंतर तयार झालेले हे नव्या समीकरणांचे चित्र यंदाची निवडणूक अधिक रोमहर्षक करणार आहे.

## हिवरखेड नगर परीषद मध्ये नगराध्यक्षासाठी ७ उमेदवार रिंगणात नगरसेवकासाठी ९९ उमेदवार

**■हिवरखेड,द २१ (प्रतिनिधी) :** नगर परीषद मधे नव्यानेच निवडनूक होत असूनदहा प्रभागातुन वीस नगरसेवक निवडून द्यायसाठी एकुन ९७ ऊमेदवार आपले नसीब आजमावत आहेत. ओबीसी महीला राखीव नगराध्यक्षासाठी ७ महीला आपले नशिब आजमावत आहेत यामधे भाजपा, राष्टीय कार्ग्रेस पक्ष ,राष्ट्वादी कॉग्रेस पार्टी, शिवसेना ऊबाठा वंचीत बहूजन शिवसेना प्रहार+शींदेसेना व काही अपक्ष असे नवनगरसेवका साठी आपली बाजी पनाला लावत आहे आज ऊमेदवारी मागे घेन्याचे शेवटचे दिवशी ११ ऊमेदवारानी आपले नाम ांकंन वापस घेतले. नगराध्यक्षपदाववर सातही दावेदार कायम राहले आहेतआजपासून प्रचाराला खरी सूरवात झाली असून दहा प्रभागातील निवडनूकीत वीस नगर सेवकापैकी दहा नगर सेवीका म्हनून दहा महीला व दहा पुरुष निवडुन येतील तर नगराध्यक्ष पदावर महीला राखीव असल्याने प्रथम होर्नाया या निवडनूकीत महिला राज राहनार आहेप्रचाराची रणधूमाळी ॲटो भोगें सायकली व द्वारपोच प्रचार चालू झाला असूनगावात प्रचारात आघाडी व मतदार भेटीवर जोर जो ऊमेदवार देऊन सपर्क साधेल व बाहेरगावच्या मतदारावर मदार असलेले सर्व राजकिय पक्षाचे गणीती ज्ञाण व आपल्या आपल्या पक्षाचा जाहीरनामा मतदारापर्यंत पोहचवुन सूज्ञ मतदार हा पाहीजे तोच ऊमेदवार निवडुन देतील.

## अवैध गावठी दारु विरोधात पोलिसांची धडक कारवाई

**■अकोला,दि २१ (प्रतिनिधी) :** पोलीस दलामार्फत जिल्ह्यातील अवैध गावठी दारू निर्मिती व विक्री करणाऱ्यां विरुद्ध 'ऑपरेशन प्रहार' अंतर्गत विशेष मोहीम राबविण्यात आली. मा. पोलीस अधीक्षक श्री. अर्चित चांडक यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक २०.११.२०२५ चे सकाळी १२.०० ते रात्री १२.०० वाजेपर्यंत ही एक दिवसीय विशेष मोहीम प्रभावीपणे पार पडली. या विशेष मोहिमेत जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांतील पोलीस पथकांनी एकूण ८३ ठिकाणी कारवाई केली आहे. कारवाईदरम्यान सुमारे ७,३३,२५० /- रुपये किमतीचा मुद्देमाल नष्ट करण्यात आला, तर अवैध धंद्यात सामील असलेल्यांवर आवश्यक ती कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे. तसेच स्थानिक गुन्हे शाखेने स्वतंत्रपणे ०१ ठिकाणी छापा टाकत अवैध दारू विक्री व निर्माण करणाऱ्या ठिकाणांवर धडक देवुन ०७ लिटर गावठी दारू व ३४० लिटर सडवा मोहमाच एकुण किंमत ५२,४००/- रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. अशा प्रकारे अकोला जिल्हा पोलिसांनी एकूण ८४ केसेस करून ७,८५,६५० /- रुपयांच्या अवैध दारू साहित्यावर कारवाई केली आहे.अवैध गावठी दारू उत्पादनामुळे जनतेच्या आरोग्याला



गंभीर धोका निर्माण होवुन व शांतता भंग होते. या पार्श्वभूमीवर अकोला पोलिस दलाने अशा अवैध धंद्यावर कठोर कारवाई करताना जनतेचा विश्वास कायम ठेवला आहे. पुढील काळात अशा प्रकारच्या अवैध व्यवसायांना आळा घालण्यासाठी या पुढे सुध्दा नेहमी कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे पोलिस प्रशासनाने कळिवले आहे.

अवैध दारू विरोधातील ही मोहीम सुरूच राहणार असून, नागरिकांनी अशा प्रकारच्या बेकायदेशीर अवैध दारू विक्री व निर्माण करणाऱ्यां विषयी माहिती असल्यास जवळच्या पोलीस ठाण्यात कळवावे, असे आवाहन अकोला पोलीस दलाकडून करण्यात येत आहे.

## सीएस प्रमाणपत्र जीएमसी मध्येच उपलब्ध ठेवा : मागणी

**अकोला :** जिएमसी येथे दुर्धर आजारांनी पीडित नागरिक, विद्यार्थी, अपंग रुग्ण, ज्येष्ठ नागरिक तसेच शासकीय कर्मचाऱ्यांच्या आरोग्य तपासणीनंतर सीएस प्रमाणपत्र याठिकाणीच उपलब्ध होते. मात्र हे प्रमाणपत्र देणारे कार्यालय इतरत्र हलविण्याची शक्यता निमर्ण झाल्याने संबंधित रुग्णवर्गास मोठी गैरसोय होणार असल्याचा इशारा देत वंचित बहुजन आघाडीकडून जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. सध्या जिएमसी मध्ये उपचारासाठी जिल्ह्यातील तसेच आजूबाजूच्या तालुक्यातील अनेक रुग्ण येतात. अपंग, दुर्धर आजारांनी त्रस्त रुग्ण किंवा वृद्ध नागरिकांना वेगवेगळ्या ठिकाणी वारंवार चकरा मारणे शक्य नसते.

### दिनांक २२ नोव्हेंबर पासून अकोला येथे

## ६४ व्या हौशी मराठी राज्य नाटय स्पर्धेला सुरुवात

**■अकोला,दि २१ (प्रतिनिधी) :** महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालया मार्फत आयोजित ६४ वी हौशी राज्य नाट्य स्पर्धा प्राथमिक फेरी अकोला येथील प्रमिलाताई ओक हॉल येथे सुरू होत आहे. दिनांक १७ नोव्हेंबर ते ०९ डिसेंबरच्या दरम्यान ठरलेल्या रोजी संध्याकाळी ७ :०० वाजता , दु:०३.०० वा , व सकाळी ११.०० वा नाटकाचे प्रयोग सादर होणार आहेत.

सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार व सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली राज्य नाट्य स्पर्धा पार पडणार असल्याचे सांस्कृतिक कार्य संचालक श्री.विभीषण चवरे यांनी नमूद केलेले आहे. या स्पर्धेमध्ये एकूण १४ संघांचा सहभाग असून अकोला, बुलढाणा, वाशीम, कारंजा येथील संघ या स्पर्धेत सहभागी होत आहेत. राज्यनाट्य स्पर्धेतील सर्व नाटकांना जास्तीत जास्त प्रेक्षकांनी उपस्थित रहावे आणि हौशी रंगकर्मींचा उत्साह वाढवावा असे आवाहन संचालक बिभीषण चवरे यांनी केलेले आहे.

## भाजपाची जि.प.वाडेगाव सर्कल कार्यकर्ता बैठक



**■पातुर,दि २१ (प्रतिनिधी) :** आगामी जिल्हा परिषद निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर आज वाडेगाव येथे भाजपा पदाधिकारी, बूथप्रमुख व कार्यकर्त्यांची संघटनात्मक बैठक पार पडली यावेळी कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक व विविध संघटनात्मक विषयांवर चर्चा करण्यात आली. विकास व सकारात्मक प्रचाराच्या माध्यमातून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत विजयश्री मिळवण्याचे आवाहन यावेळी उपस्थितांना केले.या बैठकीला आ. रणधीरभाऊ सावरकर यांच्या सह खा.अनुपभाऊ धोत्रे,महानगर अध्यक्ष जयंतराव मसने,माधवराव मानकर,अंबादासजी उमाळे,गिरीशभाऊ जोशी,मनोहरराव राहणे,वैशालीताई निकम, छायाताई मानकर, अर्चनाताई मसने,किशोर कुचके,नितीन लांडे,ॲड राहुल लोध, प्रकाशशेठ मसने,सुनील मानकर,अनिल बारबुदे आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# अकोला ते शेगाव पायीवारीचे आयोजन

## डाबकी रोडवासी कावड मित्र मंडळाचे आयोजन

**■अकोला,दि २१ (प्रतिनिधी) :** श्री संत गजानन महाराजांच्या दर्शनाच्या ओढीने, अकोला ते शेगाव या मार्गावर भव्य पायदळ वारीचे आयोजन करण्यात आले आहे. डाबकी रोड परिसरातील भाविकांनी एकत्र येऊन या वारीचे नियोजन केले असून, या वारीत सहभागी होण्यासाठी अकोलेकरांना आवाहन करण्यात आले आहे.

डाबकीरोडवासी कावड मित्र मंडळ, आदर्श मित्र मंडळ आणि बोक्या ग्रुपच्या वतीने रविवार, २३ नोव्हेंबर रोजी सकाळी ६ वाजता अकोला ते शेगाव वारीचे आयोजन केले गेले आहे. संत गजानन महाराजांच्या भक्तांसाठी ही वारी आयोजित केली आहे. डाबकी रोड येथील प्रिया टॉवर येथून ही वारी निघेल. या वारीत सहभागी होणाऱ्या वारकऱ्यांच्या सोयीसाठी आयोजकांकडून चोख व्यवस्था करण्यात आली आहे. पावलांनी शेगावच्या दिशेने मार्गक्रमण




करणाऱ्या वारकऱ्यांसाठी वैद्यकीय सुविधा, चहा, फराळ आणि जेवणाची व्यवस्था पूर्णपणे आयोजकांकडून केली जाणार आहे. या सेवाभावी उपक्रमासाठी स्थानिकांनी सहकार्य केले आहे.भक्ती आणि शिस्तीचा समन्वय असलेल्या या भव्य पायदळ वारीत अधिकाधिक भाविकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. वारीमध्ये सहभागी होण्यासाठी इच्छुक भाविक श्री राम लहरी बिल्डर्स अँड डेव्हलपर्स, प्रिया टॉवर, डाबकी रोड, अकोला येथे नोंदणी करू शकतात. भक्तीमय वातावरणात 'गण गण गणात बोते' च्या जयघोषात ही पायी दिंडी शेगावच्या दिशेने मार्गस्थ होणार आहे.

## एल.आर.टी. कॉलेजच्या एन.सी.सी. कॅडेट्सची कॅम्पमध्ये नेत्रदीपक कामगिरी

**■अकोला,दि २१ (प्रतिनिधी) :** खामगाव येथील १३ महाराष्ट्र एन.सी.सी. बटालियनने आयोजित केलेल्या सी.ए.टी.सी. कॅम्प मध्ये स्थानिक श्रीमती लक्ष्मीबाई राधाकिशन तोष्णीवाल वाणिज्य महाविद्यालयाच्या एन.सी.सी. कॅडेट्सनी उत्कृष्ट कामगिरी केली आहे. या कॅम्पमध्ये केलेल्या उत्कृष्ट कामगिरीमुळे त्यांची निवड पी.एम. सायकल रॅली सेकंड कॅम्पसाठी करण्यात आली आहे. १० नोव्हेंबर ते २० नोव्हेंबर या कालावधीत खामगाव येथे आयोजित करण्यात आलेल्या या कॅम्पचे नेतृत्व कॅम्प कमांडर कर्नल उमेश शुक्ला यांनी केले. अमरावती ग्रुपच्या ७ बटालियनमधून एकूण १५ मुले आणि २१ मुलींनी या कॅम्प मध्ये सहभाग घेतला. यामध्ये ११ महाराष्ट्र एन.सी.सी. बटालियन, अकोला येथील एल.आर.टी. कॉलेजचे ज्युनियर अंडर ऑफिसर क्रिश करावडिया आणि कार्पोरल श्रद्धा पांडे यांचा समावेश आहे. खामगाव येथील कॅम्पदरम्यान पी.एम. सायकल रॅलीच्या प्रारंभिक टप्प्यात या कॅडेट्सनी दररोज १०० किलोमीटर सायकल चालवण्याचा सराव करून भाग घेतला.

## आला हिवाळा, तब्बेत सांभाळा

## हिवाळ्यातील आजार आणि त्यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना

**■अकोला,दि २१ (प्रतिनिधी) :** हिवाळ्यात हवेत आर्द्रतेत घट येते, तापमान घसरते आणि जास्तीत-जास्त वेळ घरात राहण्यामुळे अनेक आजारांचे प्रमाण वाढते. हिवाळ्यातील काही सामान्य आजार आणि त्यांना टाळण्यासाठीच्या उपाययोजना महत्त्वाच्या आहेत. त्या पाळण्याचे आवाहन सार्वजनिक आरोग्य विभागाने केले आहे.हिवाळ्यात सर्दी, फ्लू, नोरोव्हायरस, ब्रॉन्कायटिस आणि न्यूमोनियासारखे आजार सामान्यत: दिसून येतात. थंडी सहन करणे कठीण होऊन शरीराची रोगप्रतिकारशक्ती कमी होऊन इतर आजारांचा धोका वाढतो. यावर नियंत्रण ठेवण्यासाठी काही महत्त्वाचे उपाय आहेत.

**सर्दी :** सर्दी म्हणजे श्वसनसंस्थेच्या वरच्या भागाला झालेला विषाणू संसर्ग. यामध्ये घसा बसणे, खोकला, शिंका, नाक गळणे आणि हलका ताप येणे या लक्षणांचा समावेश होतो. सर्दी हिवाळ्यात सामान्यत: होण्याची शक्यता असते, आणि लहान मुलांपासून वृद्धांपर्यंत सर्वांनाच सर्दी होऊ शकते.

**इन्फ्लुएन्झा** (Flu) इन्फ्लुएन्झा विषाणूमुळे होणारा फ्लू हा अत्यंत संसर्गजन्य आजार आहे. यामध्ये सर्दीच्या लक्षणांबरोबरच ताप, थकवा, अंगदुखी, खोकला आणि छातीत कोंडल्यासारखे वाटणे अशी तीव्र लक्षणे दिसतात. लहान मुलांना या आजारापासून अधिक सावध राहणे आवश्यक आहे.

नोरोव्हायरस (Gastroenteritis)

नोरोव्हायरस एक अतिशय संसर्गजन्य जंतू आहे ज्यामुळे गॅस्ट्रोएन्टेरायटिस (उदर संप्रेरक) होतो. यामध्ये मळमळणे, उलट्या, अतिसार आणि पोटातील मुरड यासारखी लक्षणे दिसतात. गंभीर स्थितीत हा आजार होऊ शकतो.

**ब्रॉन्कायटिस :** ब्रॉन्कायटिस हा श्वसन मार्गाचा दाह होतो, जो विषाणूंच्या संसर्गामुळे होतो. यामध्ये दीर्घकाळ खोकला, छातीत अस्वस्थता आणि हलका ताप येण्याची लक्षणे असतात. हिवाळ्यात ही लक्षणे असू शकतात, त्यामुळे त्यावर विशेष लक्ष देणे आवश्यक आहे.

**न्युमोनिया :** न्युमोनिया हा फुफ्फुसांतील हवेच्या पिशव्यांमध्ये सूज येण्याचा आजार आहे, जो बॅक्टेरिया, विषाणू किंवा फंगस मुळे होतो. यामध्ये कफ, ताप, श्वास घेताना त्रास आणि छातीत दुखणे अशी लक्षणे दिसतात.

**प्रतिबंधात्मक उपाययोजना**

१. हातांची स्वच्छता: सॅनिटायझर्सचा वापर करा किंवा हात साबणाने २० सेकंद धुवा.२. माणसांचा निकटसंपर्क टाळा: आजारी व्यक्तींच्या संपर्कात येण्याचे टाळा.३. रोगप्रतिकारशक्ती बळकट करा: संतुलित आहार, पुरेशी झोप, आणि नियमित व्यायाम करा.४. श्वसनसंस्थेचे आरोग्य सांभाळा: खोकताना तोंड आणि नाक झाकून घ्या. ५. भरपूर पाणी प्या: शरीराची आर्द्रता योग्य ठेवा.६. स्पर्शाची योग्य पद्धत: चेहऱ्याला हात लावण्याचा टाळा. ७. आजारी असाल तर घरीच राहा: त्यातल्याच लक्षणांपासून इतरांना बचाव करा.८. पृष्ठभागांचे निर्जंतुकीकरण करा: जिथे अन्न शिजवले जाते अशा ठिकाणी स्वच्छता राखा.९. धुराच्या संपर्कात येणे टाळा: तंबाखूच्या धुरासारख्या हवेतील प्रदूषकांपासून वाचण्याचा प्रयत्न करा.हिवाळ्यातील विविध आजारांपासून बचाव करण्यासाठी चांगल्या स्वच्छतेच्या सवयींचे पालन आणि निरोगी जीवनशैली महत्त्वाची आहे.

हिवाळ्यात या उपाययोजना करून नागरिकांनी आपले आरोग्य राखावे, तसेच आजारी असलेल्या व्यक्तींनी इतरांच्या संपर्कात येणे टाळावे, असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बळीराम गाढवे यांनी केले आहे.


**CHANGE IN NAME**

I Have Change My Name
---------From----------
**SYED ASIF SYED TAHIR**
---------TO--------------
**SYED ASIF SYED TAHER**
My Residential Address is
:- Plot No 13 Mehboob Nagar
Khamgaon Buldhana 444303

**CHANGE IN NAME**

I Have Change My Name
---------From----------
**AZIMODDIN SAIFODDIN**
---------TO--------------
**AZIMUDDIN SAIFUDDIN**
My Residential Address
is :- Chand Khan Plot
Near Rahil Store Washim
Road Old City Akola MH
444002.


## ट्युशन एरियात छेडप्रकरणी युवकाला अटक

अकोला : शहरातील सिव्हिल लाईन पोलीस स्टेशन हदीत ट्युशन एरियात एका विद्यार्थिनीला रस्त्यावर हात पकडून छेडछाड केल्याच्या आरोपावरून एका युवकाला पोलिसांनी अटक केली. ही घटना प्रभात किड्स स्कूलजवळ घडली असून परिसरात या प्रकरणाची मोठी चर्चा सुरू आहे.


महाराष्ट्र शासन

**विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ,नागपुर**

( महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत उपक्रम)

**विशेष प्रकल्प जलसंपदा विभाग, अमरावती**

**अकोला सिंचन मंडळ,अकोला,अकोला पाटबंधारे विभाग,अकोला.**

पत्ता :मुर्तिजापुर रोड पाण्याच्या टॉकीजवळ,अकोला ४४४००१

ई-मेल पत्ता aklirrigation@gmail.com दुरध्वणी /फॅक्स क्रमांक :- ०७२४-२४३५३१६

**निविदा सुचना क्र.१२ सन २०२५-२६**

**महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, अकोला पाटबंधारे विभाग, अकोला जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकारांकडून खालील कामाकरीता ब-१ नमुन्यातील निविदा मागवित आहेत. सविस्तर निविदा सुचना शासनाच्या** http://wrd.maharashtra.gov.in **या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सुचना फलकावर उपलब्ध आहे.**

**निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, अकोला पाटबंधारे विभाग, अकोला यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास विभागीय कार्यालयाच्या सुचना फलकावर उपलब्ध करुन देण्यात येईल.**

| अ. क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम रुपये (लक्ष) | बयाना रक्कम (रु.) | निविदा संच किंमत (रु.) | सा.बा.विभाग कडील कंत्राटदाराचा नोंदणई वर्ग | काम पूर्ण करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | अकोला पाटबंधारे उपविभाग क्र.१ सिंचन शाखा पातुर अंतर्गत मौजे कार्ला चौकी येथे तार कुंपन करणे | ८.०३ लक्ष | ८२००/- | निविदा किंमत १०००/-+ जीएसटी १८०/-एकुण ११८०/- | वर्ग ७ व त्यावरील | सहा महिने |
| २. | कारंजा रमजानपुर(नयाअंदुरा) प्रकल्पावर सिंचनासाठी पाणी मागणी अर्ज जमा करणे, सिंचनासाठी घेण्यात येणाऱ्या पाण्याचे व क्षेत्राचे मोजमाप घेणे, पाणीपट्टी वसूल करणे, सिंचनादरम्यान पाण्याचा अपव्यय टाळण्यास मदत करणे आणि प्रकल्पावर सतत लक्ष ठेवणे यासाठी मजूराचा पुरवठा करण्याचेकाम. | ५.९९ लक्ष | ६०००/- | निविदा किंमत १०००/-+ जीएसटी १८०/-एकुण ११८०/- | वर्ग ७ व त्यावरील | सहा महिने |

निविदा उपलब्ध कालावधी :- २१/११/२०२५ ते२८/११/२०२५
निविदा सादर करण्याचा :- ०१/१२/२०२५ ते ०२/१२/२०२५

जावक क्रमांक ५९०१/निलि/अपावि/२०२५/दिनांक२०.११.२०२५
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय
अकोला पाटबंधारे विभाग,अकोला.
मुर्तिजापुर रोड,पाण्याच्या टाकीजवळ, अकोला -४४४००१
जा.क्र./जिमाका/अकोला/जाहिरात/१०८/२०२५

**(चि.वि.वाकोडे)**
कार्यकारी अभियंता
अकोला पाटबंधारे विभाग,अकोला.



RNI NO-46973/1986 **Mahasagar Akola** Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak. Printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Kamala Square, Durga Chowk, Akola. **Group Editor-in-Chief and Managing Director** - Shrikrishna Tansukhdas Chandak, **Group Editor** - Sandeep Ramrao Kale, **Managing Editor** - Pankaj Shrikrishna Chandak. **Local Editor** Purushottam Madhukarrao Dhole Phone 9881489479 (Responsible for editorial as per PRB act). Head Office Phone 7447735851,9922970023.

आर.एन.आय. नोंदणी क्रमांक ४६९७३/१९८८ **महासागर अकोला** **मालक, मुद्रक, प्रकाशक :** श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, ामला स्क्वेअर, दुर्गा चौक, अकोला, येथे प्रकाशित केले. **मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक**
**स्थानिक संपादक : *पुरूषोत्तम मधुकरराव ढोले, फोन : ९८८१४८९४७९* (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी स्थानिक संपादकांची राहील.)**

# बिहारमध्ये क्रांती!

बिहारमध्ये नुकत्याच झालेल्या राज्य विधानसभेच्या निवडणुकीध्ये एनडीए आघाडीला प्रचंड बहुमत मिळाले. या अभूतपूर्व विजयाचे मूल्यमापन महागठबंधन आघाडीला करणे आवश्यक आहे.

२०२० मध्ये झालेल्या विधानसभेच्या निवडणुकीत राष्ट्रीय जनता दलाने ७५ जागांवर विजय मिळविला होता. कॉंग्रेसने १९ जागा जिंकल्या होत्या. भाजपने ७४ तर जनता दल युनायटेडने ४३ जागा जिंकल्या होत्या. तरीही नितीश कुमार मुख्यमंत्री पदावर विराजमान झाले.

आता काळ बदललेला आहे. भाजपाच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय लोकशाही आघाडीने या निवडणुकीत एक क्रांती केली आहे. अभूतपूर्व विजय असर या निकालाचे वर्णन करता येईल. राष्ट्रीय जनता दलाचा पूर्ण सफाया झाला आहे. त्याचबरोबर कॉंग्रेसने केवळ ६ जागावर विजय मिळवला. एवढा मोठा पराभव कसा झाला? या प्रश्नाचे उत्तर शोधावे लागणार आहे.

बिहार विधानसभा निवडणुकीमध्ये यावर्षी सर्वाधिक ६९% मतदान झाले. हा एक विक्रम आहे. राजकीय विश्लेषकांनी यावेळी जास्त मतदान झाल्यामुळे सत्ताधारी पक्षाचे नुकसान होईल असा अंदाज वर्तविला होता. ज्या ज्या वेळेला मतदानाची टक्केवारी वाढते. त्या त्या वेळेला सत्ताधारी पक्षाचा पराभव होत आल्याचे मागील काळात दिसून आले आहे, मात्र या निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढूनही सत्ताधारी पक्षाला लोकांनी पसंती दिली आहे हाही एक विक्रमच आहे.

सत्ताधारी एनडीए आघाडीने केलेला नियोजनबद्ध प्रचार यामुळे आणि महिलांना दिलेले आश्वासन यामुळे बिहारात क्रांती घडवून आलेलि आहे. मतदान पूर्व घेतल्या गेलेल्या एक्झिट पोल मध्ये एनडीए आघाडीचा विजय होईल असा कयास लावला होता. मात्र कोणत्याही एक्झिट पोल मध्ये इंडिया आघाडी २०० पार करेल असे भाकीत वर्तविले नव्हते.

मेट्रॉईज, चाणक्य, पोल स्टरेट,पोल डायरी, प्रज्ञापोल डीआरएफ या कंपनीने एक्झिट पोल प्रदर्शित केला. मात्र बंपर विजयाची खात्री दिली नव्हती मात्र वास्तविकतेत राष्ट्रीय लोकशाही आघाडीने सर्व तकार्ना बाजूला करत घवाघवीत यश संपादन केले. त्याबद्दल अभिनंदन केलेच पाहिजे. सुशासन बाब म्हणून बिहारात नितीश कुमारांची ओळख आहे त्याच बरोबर सत्तेसाठी इकडून तिकडे भटकण्याची त्यांची प्रवृत्ती लपून राहिली नाही. त्यामुळे पलटूराम म्हणूनही त्यांच्या चरित्रावर विरोधी पक्षांनी टीका केली आहे.

सोयीचे राजकारण करीत असताना त्यांनी आपल्या तत्त्वाला तीलांजली दिल्याचे भूतकाळातील घटनावरून दिसून येते तरी पण त्यांनी बिहारमध्ये सर्वाधिक दहा वेळा मुख्यमंत्री होण्याच्या सन्मान प्राप्त केला आहे. बिहारातील जनतेने रस्ते, वीज, आरोग्य, शाळा, सुरक्षा आणि महिला केंद्रित त्यांच्या धोरणांना प्राधान्य दिलेला आहे.

महिला मतांना प्राधान्य देण्यासाठी आता राजकीय पक्षांमध्ये स्पर्धा लागली आहे. मध्यप्रदेशात निवडणूक जिंकण्यासाठी तत्कालीन मुख्यमंत्री शिवराज सिंग चव्हाण यांनी लाडली बहीण योजना आणली. महाराष्ट्रात एकनाथ शिंदे यांनी लाडकी बहीण योजना एन निवडणुकीच्या तोंडावर आणली. त्याचबरोबर नितीश कुमार यांनी महिला बचत गटांना स्वयंपूर्ण करण्यासाठी जीविका दिदि नावाची योजना आणली . या योजनेच्या माध्यमातून महिलांच्या बँक खात्यात दहा हजार रुपये निवडणुकीच्या काळात वर्ग करण्यात आले.

निवडणुका घोषित झाल्यानंतर व आचारसंहिता लागू झाल्यानंतरही बिहारात महिलाच्या खात्यात दहा हजार रुपये टाकण्याच्या मोह बिहारच्या सरकारला आवरता आला नाही. या कामी निवडणूक आयोगाची भूमिका महत्त्वपूर्ण असताना निवडणूक आयोग डोळे मिटून बसलेला संपूर्ण देशांनी बघितला आहे.



नितीन कैलासराव गोहने
रा. हिरापूर ता. सावली
जि. चंद्रपूर.
8275393387

महिलांच्या खात्यावर आचारसंहिता लागल्यानंतर दहा हजार रुपये टाकणे हा आचारसंहितेचा भंग आहे असे असताना सुद्धा निवडणूक आयोगाचे या महत्वपूर्ण बाबीकडे दुर्लक्ष केले, हा मुद्दा विरोधी पक्षांनी लावून धरला, मात्र निवडणूक आयोगाने कुठलीही कार्यवाही केली नाही.

जनता पाच वर्षासाठी सरकारला निवडून देते या पाच वर्षात लोकांची कामे व्हावी त्याचबरोबर नागरिकांना व्यवस्थित सोयी सुविधा मिळाव्यात हा त्या मागच्या उद्देश असतो मात्र सरकारची योजना प्रभावितपणे अंमलात आणण्याऐवजी निवडणुका दोन-चार महिने असताना घोषणांच्या पाऊस पाडला जात असल्याचे चित्र सध्याच्या राजकारणात दिसून येत आहे. लोकप्रिय घोषणांची सरबत्ती निवडणुकीच्या काळात वरून कसेही करून सत्ता मिळवण्याची ही पद्धत भारतीय राजकारणात तीव्रतेने रूढ होत आहे.

महाराष्ट्राचा विचार करता लाडकी बहीण योजनेमुळे राज्याच्या अर्थसंकल्पावर मोठा ताण पडला. वर्षाला ४५ हजार कोटी रुपये या योजनेवर खर्च येत आहे. त्यामुळे इतर योजनावर पैसे खर्च करण्यास निधीची कमतरता पडत आहे. मानवी हिताच्या योजनांना कात्री लावण्यात आली, अनेक गावात पाणीपुरवठा योजना सुरू असल्या तरी निधीअभावी कामे बंद आहेत. कंत्राटदारांनी कामे केल्यानंतर ही बिले मिळत नाहीत म्हणून आत्महत्या केल्याचे उदाहरणे आहेत. शासनाचे काम केल्यानंतरही निधी उपलब्ध करून दिला नाही म्हणून सांगलीच्या हर्षल पाटील यांनी आत्महत्या केली.

अनावश्यक घोषणा करून आवश्यक योजनावर संक्रात येत आहे. महाराष्ट्र कर्जाच्या खाईत जात आहे. लाडक्या बहीण योजनेमुळे कर्जाची रक्कम वाढून आज ती ९.४२ लाख कोटी झाली आहे. ही तफावत दिवसागणिक वाढत असताना निवडणुका जिंकण्यासाठी राजकीय पक्ष सवंग लोकप्रिय घोषणांच्या पाऊस पाडत आहे. हे कुठेतरी थांबविणे आवश्यक आहे.

लोकांना मोफतच्या योजनांची सवय सरकारच्या माध्यमातून लावल्या जात असल्यामुळे ग्रामीण भागात मजूर मिळेनासे झाले आहे. याच्या परिणाम शेती उद्योगावर पडलेला आहे. सवंग लोकप्रिय घोषणा करून निवडणुका जिंकता येते, हे ताजे उदाहरण महाराष्ट्र, मध्य प्रदेश, बिहार, दिल्ली, या राज्याच्या निकालातून स्पष्टपणे दिसून येत आहे.

बिहारमध्ये अनेक प्रकारच्या समस्या आहेत. बिहार लोकसेवा आयोगाच्या परीक्षांमध्ये घोड झाल्याच्या आरोप विद्यार्थी संघटनांनी केला आहे. गुणवान विद्यार्थिनी आपण योग्य प्रकारे पेपर सोडविला तरी आम्हाला नोकरी मिळाली नाही. या सबबी खाली आंदोलने उभारली गेली. युवकांमध्ये प्रचंड रोष होता. तरुणांमध्ये बेकारीची समस्या होतीच. उच्च विद्या विभूषित तरुणांना कामधंदा मिळाला नाही. बेकारी झपाट्याने वाढली. बिहारमधील अनेक तरुण आज महाराष्ट्रात काम करीत आहेत, बिहार मधून महाराष्ट्रात कामासाठी येणाऱ्या लोकांची संख्या वाढत आहे . तिथे पाहिजे तशा रोजगाराच्या संधी दिसून येत नसल्यामुळे कामाच्या शोधासाठी बिहारातील लोक महाराष्ट्रात येत आहेत.

तरुणांचा रोष असताना सुद्धा बिहारात क्रांती घडून आली . साधारणतः १९९५ पासून लोकसभा व विधानसभा निवडणुकांचा विचार केला तर असे दिसून येते की झालेल्या निवडणुकांमध्ये प्रचंड बहुमत मिळविणे आश्चर्यजनक बाब होती. बहुमताच्या जवळपास राजकीय पक्ष जायचे काही काही वेळेला त्रिशंकू सरकार सत्तेत यायचे, जनता काठावर बहुमत द्यायची आणि त्यातून सरकार चालत असे. आता ट्रेड बदलताना दिसतोय, बिहारात भाजपा आणि जनता दल युनायटेड ने १०२ प्रत्येकी जागा लढविल्या आणि जवळपास ९०% यश प्राप्त केले. म्हणजे आताची जनता पूर्णपणे फुल बहुमत देत आहे. हे कसे शक्य आहे? याचा विचार करणेही आवश्यक आहे.

एवढे प्रचंड बहुमत येते या मागच्या कारणांची मिमांसा होने आवश्यक आहे.राहुल गांधींनी बिहारात मत चोरीचा मुद्दा पुढे आणलेला होता. मतदार यादीच्या पूर्ण परीक्षणात ७६ लाख मतदाराचे नावे वगळण्यात आली. मात्र मतचोरीचा मुद्याला नागरिकांनी नाकारल्याचे दिसून येते. मतचोरी हा गंभीर प्रकार राहुल गांधीनी पुढे आणल्यानंतर त्यावर कोणताही फरक पडलेला दिसत नाही . लोकांना आज पैसा हवाय. पैशाच्या भोवती आज निवडणुका पार पाडल्या जात आहेत. निवडणुकांच्या काळात नागरिकांच्या खात्यात एखादी योजना जाहीर करून पैसे वर्ग करा म्हणजे यश आपोआप मिळते हा नवा विचार भारतीय राजकारणात सुरू होण्याच्या मार्गावर आहे.

बिहारची निवडणूक हे याचे उत्तम उदाहरण आहे आजच्या सुज्ञ व जागरूक मतदारांनी पाच वर्षाच्या सरकारचा पूर्ण हिशोब घेऊन मतदान करावे, अशी अपेक्षा आहे, मात्र नजीकाच्या भविष्यकाळात असे होणे शक्य वाटत नाही ही वास्तविकता आहे.

# महासंकटात महाआघाडी

बिहार विधानसभा निवडणुकांच्या निकालांनी राज्याची राजकीय दिशा तर बदललीच, पण राष्ट्रीय राजकारणाची धुरीही हलवून टाकली आहे.



डॉ. प्रवीण डबली
ज्येष्ठ पत्रकार
९४२२१२५६५६

राजगला मिळालेल्या अनपेक्षित बहुमताने हे सिद्ध केले की जनतेने स्थैर्य, नेतृत्व आणि कार्यसंस्कृतीला महाआघाडीपेक्षा अधिक प्राधान्य दिले आहे. या निकालाने भाजप आणि जदयूचा आत्मविश्वास अभूतपूर्व उंचीवर पोहोचवला आहे, तर महाआघाडी महासंकटात अडकली आहे. हे महासंकट फक्त आजचे आव्हान नसून भविष्यातील राजकारणासमोरील एक गंभीर चेतावणी आहे.

बिहारच्या सध्याच्या परिस्थितीतले सर्वात मोठे परिवर्तन म्हणजे पुन्हा एकदा मुख्यमंत्री म्हणून नीतीश कुमार यांची निवड. अनेक राजकीय उलथापालथीनंतरही नीतीश कुमार यांना स्थिर, अनुभवी आणि विश्वासार्ह नेतृत्व म्हणून जनतेच्या मोठ्या वर्गाने स्वीकारले आहे. या निवडणूक निकालाने हेही दाखवून दिले की बिहारच्या राजकारणात नीतीश अजूनही ते केंद्रीय स्तंभ आहेत, ज्यांच्याशिवाय सत्तेची कल्पनाही कठीण आहे.

महिला, ग्रामीण समाज आणि सुशासनाची अपेक्षा करणाऱ्या मतदारांमध्ये त्यांची पकड अजूनही भक्कम आहे. दारूबंदी, जीविका गट, विद्यार्थिनींसाठीच्या सायकल योजना आणि आर्थिक सहाय्याने त्यांना असा सामाजिक आधार मिळाला, ज्याला महाआघाडी एकत्र येऊनही आव्हान देऊ शकली नाही.

महाआघाडीचे संकट यापेक्षा मोठे आहे. या आघाडीची सर्वात मोठी कमजोरी म्हणजे नेतृत्वाचा अभाव आणि रणनीतीतील विसंगती. राजद आपला परंपरागत यादव-मुस्लिम समीकरणापलीकडे विस्तार करण्यात अपयशी ठरली. कॉंग्रेस शेवटपर्यंत जागावाटप, उमेदवार आणि प्रचार रणनीतीबाबत असमंजसातच राहिली.

अनेक जागांवर झालेले मित्रत्वाचे संघर्ष महाआघाडीतील अंतर्गत ओढाताणी उघड करत गेले. तेजस्वी यादव बेरोजगारी आणि युवकांना जोडण्याच्या मोहिमेत गुंतले होते, तर राहुल गांधींची व्होवोट चोरीह्न आणि व्यक्तिनिष्ठ राजकारणाची भूमिका जनतेला अप्रासंगिक वाटली. घोषणापत्राला तेजस्वी प्रण म्हणत प्रचार करणे आणि कॉंग्रेसची विलंबित सहमती याने महाआघाडीची प्रतिमा अधिकच कमजोर केली.

या निवडणुकीने हेही स्पष्ट केले की जनता आज प्रयोगवादी नाही, तर परिणामकारक नेतृत्वाची अपेक्षा करते. नीतीश कुमार यांचे कामकाज, त्यांची स्थिरता आणि भाजपची संघटित निवडणूक यंत्रणा यांनी असा तालमेल साधला की महाआघाडी पूर्णपणे अप्रस्तुत दिसली. दुसरीकडे, लालू कुटुंबावरील भ्रष्टाचाराचे आरोप आणि जंगलराजची भीती अजूनही प्रभावी ठरली, ज्याने निर्णायक भूमिका बजावली.

बिहारचा हा जनादेश फक्त राज्यापुरता मर्यादित राहणार नाही. उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल आणि इतर शेजारील राज्यांतील आगामी निवडणुकांचे समीकरणही यामुळे प्रभावित होणार आहे. भाजपला बिहारच्या विजयाने नवी ऊर्जा मिळाली आहे, विशेषतः उत्तर प्रदेशात जिथे पक्ष आधीच मजबूत स्थितीत आहे.

या विजयाने संघटनेला संदेश दिला आहे की केंद्र आणि राज्यातील संयुक्त नेतृत्वाची रणनीती जनता स्वीकारते. हे सूत्र यूपीमध्ये पुनरुज्जीवित केले जाऊ शकते. तर महाआघाडीच्या पराभवामुळे विरोधकांना यूपीमध्ये कमजोर मनोबलासह उतरावे लागेल. कॉंग्रेस आधीच संघटनात्मकदृष्ट्या कमजोर आहे, आणि बिहारच्या पराभवाने तिची सौदाशक्ती आणखी कमी झाली आहे.

पश्चिम बंगालमध्येही बिहारचा परिणाम जाणवेल. तिथे तृणमूल कॉंग्रेसविरुद्ध भाजप आधीच आक्रमक आहे. बिहारचा विजय भाजपचा आत्मविश्वास वाढवेल. बंगालमध्ये महिला मतदारांचे प्रमाण मोठे आहे आणि बिहारप्रमाणेच महिला मत भाजपकडे झुकू शकते जर पक्षाने केंद्र आणि राज्यातील योजनांचा लाभ स्पष्टपणे सांगितला तर.

दुसरीकडे, बिहारसारखी विसंगती बंगालमधील विरोधी आघाडीसाठीही धोक्याची घंटा आहे. कॉंग्रेस आणि डावे पक्ष आधीच कमजोर आहेत आणि समन्वयाचा अभाव त्यांना आणखी मागे ढकलेल.

बिहारचा निकाल हेही दाखवतो की विरोधी एकता स्पष्ट नेतृत्व आणि समान रणनीतीशिवाय टिकू शकत नाही. राहुल गांधी आणि तेजस्वी यादव यांचे संयुक्त मंच तयार न होणे, शेवटपर्यंत असलेला संभ्रम, घोषणांमधील अस्पष्टता या सर्वांनी मिळून महाआघाडीला मोठा फटका दिला. यूपी आणि बंगालमध्ये जर विरोधकांना प्रभावी आव्हान उभे करायचे असेल, तर बिहारची ही चूक पुन्हा करणे त्यांना महागात पडेल.

आज बिहारमध्ये महाआघाडी फक्त निवडणुकीतील पराभवाशी लढत नाही, तर अस्तित्वाच्या संकटात सापडली आहे. राजदचा जनाधार सतत कमी होत आहे. कॉंग्रेस आपल्या इतिहासातील कमकुवतपणातून बाहेर येऊ शकत नाही. नेतृत्व, संदेश, रणनीती आणि संघटन या चारही पातळ्यांवर अपयश आल्याने महाआघाडी अपंग झाली आहे.

बिहारचा जनादेश हे स्पष्ट संकेत देतो की भविष्यातील राजकारणात जागा मिळवायची असेल, तर विरोधकांनी तात्कालिक नाऱ्यांपासून, विसंगत आघाड्यांपासून बाहेर पडून जमिनीवर आधारित, स्पष्ट आणि सुसंगत रणनीती स्वीकारावी. अन्यथा, बिहारचे हे महासंकट आगामी निवडणुकांमध्ये राष्ट्रीय पातळीवर आणखी मोठे रूप धारण करेल.

## २५ वर्षापासून नि:स्वार्थ समाजसेवेसाठी लढणाऱ्या कार्यकर्त्याचा प्रेरणादायी प्रवास..

### असाही एक सेवक आशिष ठाकरे



डॉ. प्रा. मनोज सपकाळ
(९९७०६३१२६४)

समाजकारण ही नुसती पदांची माळ नाही; तो एक ध्यास असतो, एक निष्ठा असते, आणि लोकांच्या वेदना जाणून घेऊन त्यांना समाधान देण्याचा प्रामाणिक प्रयत्न असतो.

आजच्या काळात असे लोक कमी झाले आहेत जे जनतेच्या सेवेला व्यवसाय न मानता एक कर्तव्य मानतात. हि विचार सरणी घेऊन चालणारे श्री. आशिष ठाकरे गेल्या २५ वर्षांच्या अतिशय प्रदीर्घ आणि समृद्ध अनुभवातून, लोकांची कामे करताना ज्यांनी स्वतःच्या वैयक्तिक फायद्याकडे कधीच लक्ष दिले नाही, त्यांचा प्रवास समाजातील सर्वांसाठी आदर्श ठरतो.

कोणताही राजकीय वारसा नसताना जनतेच्या प्रेमावर उभा राहिलेला प्रवास आहे. बहुतेक राजकारण्यांच्या पाठीशी एखादा राजकीय वारसा, कुटुंबाची ओळख किंवा आर्थिक पाठबळ असते. परंतु श्री.आशिषदादा ठाकरे या कार्यकर्त्यांचा प्रवास हा पूर्णपणे वेगळा आणि प्रेरणादायी आहे.

घरात कोणताही राजकीय वारसा नाही, वरदहस्त नाही, पाठराखण नाही फक्त बाळासाहेब ठाकरे यांच्या ज्वलंत विचारांची प्रेरणा, जनतेसाठी काहीतरी करायची जिद्द, आणि समाजासाठी लढण्याची हिम्मतह्न एवढ्याच्या जोरावर सुरुवात झाली.

भारतीय विद्यार्थी सेनेच्या शाखाप्रमुख पदावरून अगदी जमिनीपासून सुरू झालेला प्रवास, पुढे कार्यकर्त्यांचे मार्गदर्शन, नेतृत्व, संघर्ष, आंदोलन यामुळे वाढत गेला. लोकांचे प्रेम, विश्वास आणि त्यांची कामे करण्याची तळमळ यामुळे पोहोचलेले शिखर म्हणजे शिवसेना शहरप्रमुख पद.

हे पद हे सत्तेचे प्रतीक नाही, तर लोकांनी दिलेल्या विश्वासाचे प्रमाणपत्र आहे. त्या पदाचाही राजीनामा देऊन जनतेनी दिलेल्या आपला कार्यक्षम-निर्भय-विन्रम सेवक या उपाधीने मार्गक्रमण करत आहे...

आजच्या काळात कोणत्याही क्षेत्रात मोबदला न घेता काम करणारे किती जण आहेत? नगण्य. परंतु या कार्यकर्त्यांची ओळखच वेगळी आहे, नियमनिष्ठ, सचोटीने, कुठलाही पैसा किंवा व्यक्तिगत स्वार्थ न ठेवता लोकांची सेवा करणे.असाच ध्यास आहे

त्यांच्यासाठी लोकांची समस्या म्हणजे फक्त एक तक्रार नसून एका कुटुंबाची काळजी हि त्यांची वैचारिक ठेवण आहे. कोणाला शासकीय योजनांत अडचण आली असो, कुणाला रुग्णालयात मदत लागली असो, कोणाचे दस्तऐवज अडले असो अथवा कुणाला प्रशासकीय अन्याय झाला असो ते प्रत्येक काम मनापासून करून देतात.हीच कार्यपद्धती त्यांना इतरांपासून वेगळे करते.

लोकांचे प्रश्न सोडवताना परिस्थितीप्रमाणे वागणे अत्यंत महत्त्वाचे असते.कधी प्रशासनाकडून दुर्लक्ष झाल्यास ते कठोर भूमिका घेतात . आंदोलने, रास्ता रोको, मोर्चे, निवेदने आणि कधी लोकांची समस्या संवादातून सुटू शकते तेव्हा ते संयम व सौजन्य दाखवतात.

त्यांच्यातील या दोन वेगळ्या पण आवश्यक बाजूंमुळे लोकांमध्ये त्यांच्याबद्दल आदर आणि विश्वास अधिकच दृढ होतो आहे.

अनेक कार्यकर्ते स्वतःला फक्त आपल्या प्रभागापुरते मर्यादित ठेवतात.परंतु त्यांचा दृष्टीकोन व्यापक आहे. पाणीपुरवठा, वीजपुरवठा, पथदिवे, रस्त्यांची दुरावस्था, कचऱ्याची समस्या, कला, क्रीडा जलनिस्सारणाचे प्रश्न अशा असंख्य नागरी समस्यांवर त्यांनी सातत्याने प्रयत्न केले आहेत.

अनेकदा प्रशासनाने दुर्लक्ष केल्यास त्यांनी शहराच्या हितासाठी आवाज उठवला, लोकांचे प्रश्न सोडवण्यासाठी झटले, अगदी यासाठी राजकीय गुन्हे सुद्धा नोंदवले गेले तरीही मागे हटले नाहीत. त्यांच्यासाठी गुन्ह्याची भीती नाही, परंतु जनतेचा त्रास होऊ नये हीच मोठी गोष्ट असे आशिष दादा समजतात. लोकांना नेता हवा असतो जो संकटात त्यांच्या पाठीशी उभा राहील पण हा मनुष्य सेवक बनून हे कार्य करतोय.

त्यांचा जनसंपर्क हा केवळ मतांसाठी किंवा प्रचारासाठी नाही तर कोणाच्या घरी आजार असेल,कोणाची उपचारासाठीची धावपळ असेल,कोणाला रक्त हवे असेल, तर कोणाच्या घरी अचानक संकट ओढावले असेल ते अगदी पहिल्या फोनवर तत्काळ उपस्थित होऊन उपलब्ध नसेल तर फोन वरून यथायोग्य मदत करतात.

मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनाह्न सदस्य म्हणून त्यांनी अनेक महिलांना आर्थिक, सामाजिक आणि शासकीय मदतीच्या माध्यमातून हात दिला आहे. तसेच संजय गांधी निराधार योजना, अपंग कल्याण योजना, आधार कार्ड,आयुष्मान भारत कार्ड, रेशन कार्ड असे अनेक जीवन उपयोगी प्रमाणपत्रे, कागदपत्रे, सरकारी प्रक्रियांची मदत आशिषदादा ठाकरे करतच असतात. या सर्व क्षेत्रांत हजारो लोकांना त्यांनी मार्गदर्शन व पाठबळ दिले आहे.

सरकारी यंत्रणांच्या गुंतागुंतीत अडकलेल्या लोकांसाठी ते आधार, विश्वास आणि सोपे समाधान बनले आहेत. त्यांचा समाजकारणाचा मंत्र स्पष्ट आहे.. लोकांचे प्रेम, लोकांचा विश्वास आणि लोकांची सेवा हेच खरं धन. शिवभावे-जीवसेवा. हे सूत्र घेऊन लोकांसाठी उभा राहणारा आधारस्तंभ म्हणजे आशिषदादा ठाकरे..

■ ■ ■

### वाचक लिहितात

#### भटक्या कुत्र्यांच्या नियोजनासाठी योग्य पद्धत असावी

नागपूर शहरातील भटक्या कुत्र्यांची समस्या दिवसेंदिवस वाढतच आहे. अलीकडेच घडलेली एक घटना तर नागरिकांच्या सुरक्षेबाबत अनेक प्रश्न उपस्थित करते. भटक्या कुत्र्यांना पकडण्यासाठी आमच्या भागात २० ते २५ वयोगटातील काही तरुण ३ - ४ दुचाकीवर डबलसिट बसून, हातात जाळी घेऊन, मोठ्या वेगात कुत्र्यांचा पाठलाग करत असल्याचे दिसले. ही संपूर्ण प्रक्रिया अत्यंत धोकादायक व असंवेदनशील होती. कुत्र्यांना जाळ्यात अडकवण्याच्या प्रयत्नात ती प्रचंड घाबरली होती, चवताळून इकडे-तिकडे पळू लागली. त्यांच्यामागे मुलांनी भरधाव वेगात गाड्या चालवल्याने अशा परिस्थितीत अपघाताची शक्यता असते. कारण रस्त्याने ये- जा करणाऱ्यांना यातील काहीच माहिती नव्हती. घाबरलेले कुत्रे कुणावर हल्ला करण्याची भीती असते, तसेच ते कोणाच्या घरात घुसण्याचा धोका असतो. जग आज कितीही प्रगत झाले असले, तरी अशा अघोरी, जीवघेण्या व अव्यवस्थित पद्धती आजही वापरात असल्याचे चित्र अतिशय खेदजनक आहे. महानगरपालिकेने अशा मोहिमांबद्दल कोणतीही पूर्वकल्पना नागरिकांना न देणे, तसेच प्रशिक्षित पथकाऐवजी अशा असुरक्षित पद्धतींचा अवलंब करणे हे नक्कीच प्रश्न निर्माण करणारे आहे. नागपूरसारख्या महानगरात असे बेछूट, धोकादायक प्रकार घडत असल्यास नागरिकांमध्ये भीती निर्माण होणे स्वाभाविक आहे. मनपा प्रशासनाने तातडीने या विषयावर अभ्यास करून वैज्ञानिक, सुरक्षित व मानवीय उपाययोजना राबवाव्यात, ही सामान्य नागरिकांची अपेक्षा आहे.

■ सौ. प्रांजली ब्रम्हे

#### अनाठायी खर्च

नागपुरात होणाऱ्या हिवाळी अधिवेशनासाठी मंत्र्यांचे बंगले, आमदार निवास आणि कार्यालयांची डागडुजी, रंगरंगोटी केली जात आहे. दोन आठवड्याच्या अधिवेशनासाठी कोट्यवधीची उधळपट्टी होते. दुसरीकडे, वृद्धापकाळ निवृत्ती वेतन, श्रावण बाळ योजनेचे अनुदान अनेक महिन्यांपासून प्रलंबित आहे. प्राधान्य कशाला द्यायचे? हे सरकारने ठरवायला हवे.

■ स. दा. निंबेकर, नागपूर.





## भंडारा जिल्हा पोलीस प्रशासनातील रोल मॉडेल

### उत्तरार्ध

**दिशा** - महत्त्वकांशी युवक युवतींना यूपीएससी, एमपीएससी, आदि स्पर्धात्मक परीक्षा देता याव्यात ह्यासाठी ऑनलाईन आणि ऑफलाईन मोफत मार्गदर्शन करण्याच्या हेतूने दिशा उपक्रमांतर्गत यु-ट्युब आणि वेबसाईट सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

जिल्ह्यातील १००० युवकांची योग्य चाचणीद्वारे पोलीस अधीक्षकांनी निवड केली आहे. त्यांना स्वतः पोलीस अधीक्षक नुरुल हसन आणि इतर अधिकारी हे देखील गरजेनुसार मार्गदर्शन करतात.

**एआय आधारित के पी आय टूल** - ही कृत्रिम बुद्धिमत्तेच्या आधारे स्वयंचलित माहिती गोळा करणारी प्रणाली असून, त्याद्वारे वेगवेगळ्या पोलीस ठाणे अंतर्गत प्रकरणावर काय कारवाई सुरू आहे, तपास योग्य दिशेने होत आहे की अनावश्यक विलंब होत आहे याबाबतची माहिती घेणे शक्य झाले आहे. या अंतर्गत वेगवेगळ्या 42 मापदंडांचा उपयोग करून त्यावर गुणांकन करून पोलीस कार्यक्षमता तपासली जाते. गरज असेल तेथे संबंधितांना योग्य निर्देशही दिल्या जातात.

ह्या मापदंडात त्या-त्या ठिकाणी गुन्ह्यात झालेली वाढ किंवा घट कितपत झाली, तपासाची गुणवत्ता, प्रलंबित प्रकरणे अगर निकाली प्रकरणे किती इ. प्रकारच्या मापदंडांचा समावेश आहे.

**क्यू-आर कोड आधारित नार्कोटिक्स आणि वाळू माफिया प्रतीबंध अभियान**

या अभियाना अंतर्गत अमली पदार्थाच्या बेकायदेशीर व्यापाराला आळा घालणे, त्याच्या दुष्परिणामाबाबत युवकांना शिक्षित करणे, त्यांच्या आहारी गेलेल्यांचे पुनर्वसन करणे, त्या बरोबरच वाळू तस्करांवर कडक कार्यवाही करून त्याला प्रतिबंध घालणे, आदी उपाययोजनांचा समावेश आहे.

वाळू तस्करांवर करण्यात आलेल्या कार्यवाहीमुळे मोठ्या प्रमाणात चोरी झालेली वाळू जप्त करण्यात आली आहे. वर्षभरात अशा प्रकारे जिल्ह्यात गोळा करण्यात आलेल्या वाळूची किंमत रु. १०० कोटी एवढी अनुमानित करण्यात आली आहे.

पोलीस अधीक्षक नुरुल हसन यांच्या नेतृत्वात करण्यात आलेल्या वरील कामगिरीची राज्यभर प्रशंसा होत असून, भंडारा पोलिसांना राज्याचे पोलीस महानिर्देशक यांनी उत्कृष्ट चौकशीबाबत देण्यात येणारे पारितोषिक देऊन पुरस्कृत केले आहे. शिवाय एफएआयसीसी या विख्यात संस्थेद्वारे ही गौरविण्यात आले आहे. सायबर बॉट या उपक्रमाची दखल घेऊन स्कॉच फाउंडेशननेही प्रशस्तीपत्र दिले आहे.

#### प्रभाव तंत्रज्ञानाचा

एआय टेक आणि इतर उपक्रमामुळे भंडारा पोलिसांना गुन्हेगारीला आळा घालण्यात यश प्राप्त झाले आहे. खुनाच्या घटना वर्षभरात ३४ वरून ७ वर तर खुनाचा प्रयत्न करण्याच्या घटना १९ वरून १४ वर आल्या आहेत. दरोडा, चोरी, लुटमार इ. गुन्ह्यातही घट झाली आहे. परिणामी वरील उपक्रम इतर जिल्ह्यातही राबविण्यात येत आहेत. तंत्रज्ञानाधारित पोलीसिंगमध्ये भंडारा जिल्हा पायलट जिल्हा म्हणून सर्वत्र ओळखल्या जात आहे. भंडारा पोलिसांना विविध पुरस्कारांनी गौरवान्वित करण्यात आले असून, राज्यभर त्यांच्या कामगिरीची वाहवा होत आहे.

-------------

: शब्दांकन :
रणजीत चंदेल, यवतमाळ
9422866931

■ ■ ■

## हिवाळ्यात व्हिटॅमिन डीची कमतरता कशी पुर्ण कराल?





हिवाळा सुरू होताच आपण आपल्या आरोग्याची काळजी घेत असतो. या दिवसांमध्ये जास्त करून व्हिटॅमिन डीची कमतरता अधिक भासू लागते. कारण थंडीच्या दिवसांमध्ये शरीराला पुरेसा सुर्यप्रकाश मिळत नाही. तर व्हिटॅमिन डीचा सर्वात मोठा स्त्रोत सुर्यप्रकाश आहे. त्याशिवाय लोकं थंडीपासून वाचण्यासाठी जास्त वेळ घरात असतात, म्हणून शरीराला सूर्यप्रकाश मिळत नाही. अशावेळेस हिवाळ्यात व्हिटॅमिन डीची कमतरता सामान्य होते.

हिवाळ्यात व्हिटॅमिन डीची कमतरता शरीरावर अनेक प्रकारे परिणाम करते. शरीर योग्य रित्या कार्य करण्यासाठी अनेक खनिजांसह पुरेशा प्रमाणात व्हिटॅमिन आणि प्रथिने आवश्यक असतात. कारण तुम्हाला व्हिटॅमिन डीच्या कमतरता जाणवत असेल तर शरीरात वेदना, स्नायू कमकुवत होणे, थकवा आणि आळस येऊ शकतो. तसेच त्याचा रोगप्रतिकारक शक्तीवर खोलवर परिणाम होतो, ज्यामुळे शरीर संसर्गास अधिक संवेदनशील बनते आणि आपण सर्दी आणि फ्लू सारख्या आजारांना सहज बळी पडते.

काही प्रकरणांमध्ये, मूड स्विंग, चिडचिड आणि झोपेचा त्रास देखील दिसून येतो. व्हिटॅमिन डीच्या कमतरतेमुळे मुलांमध्ये हाडांची वाढ मंदावते आणि वृद्धांमध्ये हाडांच्या फ्रॅक्चरचा धोका वाढतो. यासाठी हिवाळ्यात व्हिटॅमिन डीचे संतुलित सेवन राखणे अत्यंत महत्वाचे आहे.

तज्ञांच्या मते हिवाळ्यात व्हिटॅमिन डीची कमतरता दूर करण्यासाठी सकाळचा सौम्य सूर्यप्रकाश आवश्यक आहे. सकाळी १० ते दुपारी १ या वेळेत १५ ते २० मिनिटे सूर्यप्रकाशात राहिल्याने शरीरात व्हिटॅमिन डीची पातळी नैसर्गिकरित्या वाढते.

याव्यतिरिक्त आहारात अंड्यामधील पिवळा भाग, मशरूम, फोर्टिफाइड दूध, दही, तूप आणि फॅटयुक्त मासे यासारखे पदार्थ समाविष्ट करा.

नियमित व्यायाम आणि संतुलित आहारामुळे पोषक तत्वांचे शोषण देखील सुधारते. लक्षात ठेवा की कोणतेही पूरक आहार स्वतः घेऊ नका; प्रथम डॉक्टरांचा सल्ला घेणे महत्वाचे आहे.

शिवाय, वयानुसार शरीराची व्हिटॅमिन डी तयार करण्याची क्षमता कमी होते, म्हणून वृद्धांनी विशेष काळजी घेतली पाहिजे. लहान मुलांना उन्हात खेळण्यास प्रोत्साहित करणे त्यांच्या हाडांच्या विकासासाठी देखील फायदेशीर आहे.

**व्हिटॅमिन डीची कमतरता भरून काढण्यासाठी हे देखील आवश्यक आहे**

दररोज किमान १५ मिनिटे उन्हात उभे राहा.
तुमच्या आहारात व्हिटॅमिन डी आणि कॅल्शियमयुक्त पदार्थांचा समावेश करा.
हिवाळ्यात जास्त घरात राहणे टाळा.
नियमित व्यायाम करा.
गरज पडल्यास डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार पूरक आहार घ्या.

■ ■ ■

### अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



#### जाहीर प्रवेश

पक्षाला हवी सत्ता
असंतुष्टांना हवे टिकीट
दोघांचं जमलं मेतकुट
की प्रवेश होतो फिट ..

पक्ष असो कोणताही
डोक्याला असतो ताप
सत्तेवर आल्यावरच
कळते आपोआप..!

निवडणुका येता जवळ
सुरु होती पदयात्रा मेळावे
नेत्यांना एकच ध्यास
जनतेपुढे कसे प्रगट व्हावे?



# बालांगण

## भावनांचे माध्यम, गिटार

गिटार हे जगातील सर्वात लोकप्रिय वाद्यांपैकी एक आहे. गिटार पॉप, रॉक, जाझ, फोक, शास्त्रीय संगीत किंवा भजन, काव्यगायन या सर्व संगीतप्रकारात वापरले जाते. गिटारचे शरीर लाकडापासून बनवले जाते. त्याला सहा, सात किंवा बारा तारा असतात. या तारांवर बोटांनी दाब देऊन आणि दुसऱ्या हाताने त्या तारा वाजवून सूर तयार केले जातात.

गिटारचे दोन मुख्य प्रकार असतात. अकौस्टिक गिटार आणि इलेक्ट्रिक गिटार. अकौस्टिक गिटारचा आवाज नैसर्गिक असतो. त्यात एक मोठे पोकळ शरीर असते ज्यामध्ये तारांची कंपने घुमतात आणि आवाज तयार होतो. इलेक्ट्रिक गिटारमध्ये आवाज वाढवण्यासाठी अॅम्प्लिफायर वापरावा लागतो. त्याचा आवाज खूप दमदार असतो. तो विविध प्रकारे बदलता येतो. त्यामुळे तो रॉक किंवा मेटल संगीतामध्ये जास्त वापरला जातो.

वाद्यांची ओळख

गिटारमधील प्रत्येक सूर कॉर्ड नावाच्या जोडीतून तयार होतो. काही मूलभूत कॉर्ड्स् शिकल्या की जवळजवळ शेकडो गाणी वाजवता येतात. अलीकडे इंटरनेटवर गिटार शिकण्यासाठी खूप व्हिडिओ आणि अॅप्स उपलब्ध आहेत. त्यामुळे अगदी प्राथमिक स्वरूपाची गिटार वाजवणे सोपे झाले आहे. जगातील काही प्रसिद्ध गिटार वादकांमध्ये जिमी हेंड्रिक्स, एरिक क्लॅप्टन, कार्लोस सँटाना यांची नावे घेता येतात. भारतातही ए. आर. रहमान, इलया राजा, तसेच अनेक बँड्समधील गिटारवादकांनी गिटार लोकप्रिय बनवले आहे. गिटार हे केवळ वाद्य नव्हे, तर ते भावनांचे माध्यम आहे. कधी शांत सुरावटीने मन शांत करते, तर कधी जोरदार तालांनी अंगात ऊर्जा निर्माण करते. म्हणूनच गिटार प्रत्येक पिढीला आवडते आणि त्याचे आकर्षण कधीच कमी होत नाही.

## वाहतुकीची भन्नाट साधनं

मित्रमैत्रिणींनो, वाहतुकीची बरीच साधनं आहेत. एखाद्या ठिकाणी लवकर पोहोचायचं असेल तर तुम्ही विमानाने जाऊ शकता. ट्रेन, टॅक्सी, मेट्रो, बस अशा विविध माध्यमांद्वारे तुम्ही प्रवास करू शकता. जगभरातही अशी अनेक साधनं आहेत. प्रत्येक देशाचं एक वेगळेपण आहे. वाहतुकीच्या अशाच काही भन्नाट पर्यायांविषयी...





♥ क्युबामध्ये कोको टॅक्सी चालवली जाते. कोको टॅक्सी काळ्या आणि पिवळ्या रंगाची असते. पिवळ्या रंगाची टॅक्सी पर्यटकांसाठी तर काळ्या रंगाची टॅक्सी स्थानिकांसाठी असते. या टॅक्सीचा आकार नारळाच्या करवंटीसारखा असतो. त्यामुळे या टॅक्सीला कोको टॅक्सी हे नाव पडलं.

♥ व्हिएतनाममध्ये सायक्लो रिक्षा खूप लोकप्रिय आहे. भारतातल्या अनेक शहरांमध्ये सायकल रिक्षा पहायला मिळतात. सायक्लो हा तसाच एक प्रकार आहे. सायक्लो हो तीन पायांची सायकल आहे. ही सायकल खूपच अनोखी आहे. याच्या पुढच्या बाजूला प्रवाशांसाठी आसन असतं तर मागच्या बाजूला चालक बसतो. व्हिएतनाममध्ये भटकंतीसाठी या सायकल रिक्षाने फिरता येतं.

फन टाईम

♥ पोर्तुगालमध्ये मोंटे टोबोग्गन नावाचं एक साधन आहे. इथल्या मदिरा बेटांवर त्यांचा वापर होतो. मोंटे टोबोग्गन बनवण्यासाठी लाकूड आणि वेताचा वापर केला जातो. डोंगरावरून खाली येण्यासाठी मोंटे टोबोग्गनचा वापर केला जातो. इथल्या नागमोडी रस्त्यांवर प्रवास करण्यासाठी हे अत्यंत उपयुक्त साधन ठरतं.

♥ जर्मनीमधल्या वुपरटल शहरात जवळपास ३९ फूट उंचीवर सस्पेन्शन मोनोरेल तयार करण्यात आली आहे. ही मोनोरेल म्हणजे वाहतुकीचं अनोखं साधन आहे. या मोनोरेलचे डबे आणि स्थानकं बनवण्यासाठी जवळपास १९,२०० टन स्टील वापरण्यात आलं आहे. ही मोनोरेल जर्मनीमध्ये १९०१ पासून सुरू आहे. संपूर्ण शहरात मोनोरेलची २० स्थानकं आहेत.

♥ कंबोडियामधली बांबू ट्रेन खूपच प्रसिद्ध आहे. ही ट्रेन ३.७ किलोमीटरचं अंतर कापते. यासाठी २० मिनिटं लागतात. या ट्रेनला डबे किंवा इंजिन नाही. ती बांबूपासून तयार करण्यात आली आहे. या ट्रेनमध्ये बसायची मजाच वेगळी!

## विमानाचा रंग पांढराच का?

मुलांनो, तुम्ही विमानात बसला आहात का? विमानात बसला नसाल तरी तुम्ही विमान तर बघितलंच असेल. प्रत्येक विमानाचा रंग हा पांढरा असतो. विमान कोणत्याही कंपनीचं असलं तरी त्याला दुसरा रंग दिला जात नाही. असं का बरं होत असावं? विमानाला पांढऱ्याशिवाय दुसरा रंग का बरं दिला जात नसावा? यामागे बरीच कारणं आहेत. पण विमान थंड रहावं म्हणून त्याला पांढरा रंग दिला जातो. विमान आकाशात उडतं. त्यावर सूर्याची किरणं पडत असतात. पांढरा रंग शीतल असतो. हा रंग सूर्याची उष्णता कमी प्रमाणात शोषून घेतो. म्हणूनच उन्हाळ्यात पांढरे किंवा फिकट रंगाचे कपडे घालण्याचा सल्ला दिला जातो. त्या धर्तीवर विमान थंड रहावं म्हणून पांढऱ्या रंगाचा वापर केला जातो.

असं का?




विमानाला पांढरा रंग देण्याचं अजून एक महत्त्वाचं कारण म्हणजे इतर रंग दिले तर विमान कंपन्यांना भरपूर पैसे द्यावे लागतात. त्या तुलनेत पांढरा रंग कमी खर्चात दिला जातो. यामुळे कंपनीचे पैसेही वाचतात. तसंच पांढरा रंग द्यायला फार वेळही लागत नाही. इतर रंग द्यायला वेळही जास्त लागतो. या गोष्टींचा विचार करून विमानाला पांढरा रंग दिला जातो.



## बीएस म्हणजे काय?

दोस्तांनो, तुम्ही बी ६ इंजिनाबद्दल ऐकलं असेल. नव्या वाहनांमध्ये बी ६ इंजिन बसवलं जातं. प्रदूषणाचं प्रमाण कमी करण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. मध्यंतरी बीएस ४ इंजिनाच्या बाबतीतही असाच निर्णय घेण्यात आला. ३१ मार्च २०२० नंतर बीएस ४ इंजिनवाल्या गाड्यांची विक्री करता येणार नाही, असा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिला. म्हणूनच आता या इंजिनबाबत चर्चा सुरू झाली आहे. बीएस ४ इंजिन म्हणजे नेमकं काय हे जाणून घेऊ.

बीएस म्हणजे भारत स्टेज. हे एक परिमाण आहे. भारतात गाड्यांच्या माध्यमातून होणाऱ्या प्रदूषणाचं मोजमाप बीएस या परिमाणाने केलं जातं. हे मानक भारत सरकारनेच तयार केलं आहे. बीएस ३, बीएस ४, बीएस ५, बीएस ६ अशी मानकं निश्चित करण्यात आली आहेत. बीएस ६ इंजिनमधून कार्बनचं उत्सर्जन कमी प्रमाणात होतं. बीएसच्या पुढचा आकडा जेवढा मोठा तेवढं ते इंजिन सुरक्षित किंवा कमी प्रदूषण करणारं मानलं जातं. एक एप्रिलपासून बीएस ६ इंजिनं बंधनकारक करण्यात आली आहेत. त्यामुळे आता वाहन कंपन्या बीएस ६ इंजिनवाल्या वाहनांची निर्मिती करू लागली आहेत.

जाणून घ्या


## विशाल ब्रह्मपुत्र

ब्रह्मपुत्र ही भारतातील सर्वात मोठ्या आणि महत्त्वाच्या नद्यांपैकी एक आहे. तिचा जन्म तिबेटमधल्या हिमालयाजवळील तलावातून होतो. तिबेटमध्ये तिला 'सांगपो' असे नाव आहे. अरुणाचल प्रदेशातून भारतात प्रवेश करताना ती मोठ्या वेगाने दऱ्याखोऱ्यांमधून वाहत येते. पुढे ती आसाममध्ये पोहोचते. तिथल्या सपाट मैदानात आली की तिचा वेग कमी होतो. शेती, पिण्याचे पाणी, मासेमारी आणि वाहतूक यासाठी तिचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो. या नदीचा प्रवाह खूप रुंद आहे. काही ठिकाणी तर ती १० ते १५ किलोमीटरपर्यंत पसरलेली दिसते. काही पुराणकथांनुसार ब्रह्मदेवांची कन्या म्हणून तिला 'ब्रह्मपुत्रा' म्हणतात. परंतु तिचे विशाल रूप पाहून ब्रह्मपुत्र असेही म्हटले जाते. पावसाळ्यात ब्रह्मपुत्र नदीला अनेकदा पूर येतो. पण याच पुरामुळे सुपीक



गाळ जमिनीवर साचतो. त्यामुळे शेती चांगली होते. ब्रह्मपुत्रेच्या काठावर अनेक प्रकारचे पक्षी, प्राणी, वनस्पती तसेच एकशिंगे गेंडे आणि अनेक दुर्मिळ मत्स्यप्रजाती आढळतात. ब्रह्मपुत्र नदी बांगलादेशात गेल्यावर गंगेला मिळते. दोन्ही नद्यांचा तिथे एक त्रिभुजाकार डेल्टा तयार होतो. हा जगातील सर्वात मोठा डेल्टा आहे. या नदीवर बोगीबील पूल हा भारतातील सर्वात लांब रेल्वे-रोड पूल आहे. गुवाहाटी, तिनसुकिया, यासारखी अनेक शहरे ब्रह्मपुत्रेच्या काठावर आहेत. गुवाहाटी येथे कामाख्या देवीचे प्रसिद्ध मंदिर आहे. तर बांगलादेशात ढाका आणि मैमनसिंहसारखी अनेक महत्त्वाची शहरे आहेत. भारतात अरुणाचल प्रदेशात दिबंग, सबनसिरी ही मोठी धरणे आहेत. काही धरणे अजून बांधली जात आहेत. ब्रह्मपुत्र नदी खरोखरीच आसामची जीवनरेखा आहे.

ओळख नद्यांची



### ठिपके जुळवा



## असे आहेत गार्बेज कॅफे




आपण आपला देश स्वच्छ ठेवायला हवा. नागरिकशास्त्रात आपण आपली कर्तव्यं शिकतो. पण ही कर्तव्यं पार पाडतो का? रस्त्यावर कचरा न करणं हे आपलं कर्तव्यच आहे. प्लास्टिकमुळे पर्यावरणाचं बरंच नुकसान होत आहे. म्हणूनच या कचऱ्याचं प्रमाण कमी करण्यासाठी विविध शहरांमध्ये गार्बेज कॅफे ही संकल्पना राबवली जात आहे. चला तर मग, गार्बेज कॅफे म्हणजे नेमकं काय हे जाणून घेऊ.

● जुलै २०१९ मध्ये देशातला पहिला गार्बेज कॅफे सुरू करण्यात आला. हा कॅफे छत्तीसगडमध्ये सुरू झाला. या कॅफेमध्ये प्लास्टिकचा कचरा दिल्यानंतर गरीबांना अन्नदान केलं जातं. एक किलो प्लास्टिक आणणाऱ्यांना पोटभर जेवण दिलं जातं तर अर्धा किलो प्लास्टिक आणणाऱ्यांना नाश्ता दिला जातो. हे सर्व प्लास्टिक रस्ता तयार करण्याच्या कामासाठी वापरलं जात आहे.

● गेल्या वर्षी डिसेंबर महिन्यात दिल्लीमध्ये गार्बेज कॅफे सुरू झाला. इथेही प्लास्टिकचा कचरा दिल्यानंतर पोटभर जेवण दिलं जातं. द्वारका परिसरातल्या एका मॉलमध्ये हा गार्बेज कॅफे आहे. इथे प्लास्टिकचा कचरा दिल्यानंतर आवडत्या रेस्टॉरंटमध्ये जेवता येतं. प्लास्टिकच्या वजनानुसार लोकांना कूपन दिलं जातं.

गंमत ग्यान

● गुजरातमधल्या दाहोदमध्ये देशातला तिसरा गार्बेज कॅफे सुरू करण्यात आला. इथे अर्धा किलो प्लास्टिक देणाऱ्यांना चहा तर एक किलो प्लास्टिक देणाऱ्यांना नाश्ता दिला जातो.

या सगळ्या प्लास्टिकचा वापर रस्ते बांधण्यासाठी केला जाणार आहे. इंडियन ऑईल कॉर्पोरेशनने अशा प्लास्टिकचा वापर करून रस्ता बांधला आहे.

## इकारसचे पंख

प्राचीन काळची गोष्ट. ग्रीसमध्ये डेडालस नावाचा एक कुशल कारागीर होता. तो वेगवेगळ्या प्रकारच्या अनेक सुंदर वस्तू बनवत असे. एकदा एका दुष्ट जादूगाराने त्याच्या मुलाला, इकारसला पळवून नेले आणि एका बेटावर कैदेत ठेवले. डेडालस आपल्या मुलाला शोधत त्या बेटावर पोचला. खूप प्रयत्न करून त्याने



त्या जादूगाराच्या घरात प्रवेश केला. जादूगाराला ठार मारून डेडालस परत निघाला. परंतु त्याने आणलेली नाव समुद्राच्या लाटांबरोबर वाहून गेली होती. पण डेडालस हुशार होता. त्याने काही वेळ विचार केला आणि पक्ष्यांची पिसे आणि मेण वापरून दोन मोठे पंख बनवले. एक स्वतःसाठी आणि एक मुलासाठी. आता या पंखांनी आपण आकाशात उडणार आहोत आणि समुद्र ओलांडून घरी जाणार आहोत. पण एक गोष्ट लक्षात ठेव. खूप वर उडू नकोस. सूर्य जवळ आला तर मेण वितळेल. आणि खूप खाली पण उडू नकोस. समुद्राच्या लाटा पंख ओले करतील. मध्यम उंचीने शांतपणे उड. उडण्यापूर्वी डेडालसने इकारसला समजावलं.

सुरुवातीला इकारस नीट उडत होता. पण आकाशात त्याला खूप आनंद आणि उत्साह वाटला. मी तर पक्ष्यांपेक्षा जास्त शक्तिशाली आहे! मी अजून वर उडणार! तो वडिलांच्या सूचना विसरला आणि सूर्याकडे वरवर उडू लागला.

सूर्याच्या उष्णतेने त्याच्या पंखांतील मेण वितळायला लागले. पिसे खाली पडू लागली. इकारसने घाबरून वडिलांना हाका मारल्या. पण तो पंख मोडून गेल्यामुळे हळूहळू समुद्रात कोसळला. डेडालस दुःखी झाला. त्याने इकारसचे नाव त्या समुद्राला दिले. आजही ग्रीक लोक त्या समुद्राला इकारियन समुद्र म्हणूनच ओळखतात.

ग्रीक लोककथा




दोस्त हे मस्त

### दणकट याक



दोस्तांनो, वाळवंटात वाहतुकीसाठी उंटांचा वापर होतो. त्याचप्रमाणे बर्फाळ प्रदेशात याक हा प्राणी असतो. याक हा गाय, बैलांसारखाच दिसतो. मात्र त्याच्या अंगावर खूप केस असतात. याक शाकाहारी प्राणी आहे. तो गवत खातो तसंच भरपूर पाणी पितो. पाळीव याक शेतात राबतात. याकची शिंगं दणकट आणि टोकदार असतात. खूप थंडी पडल्यावर याक आपल्या शिंगाने बर्फ खणून गवत खातो. याक अत्यंत धिप्पाड असा प्राणी आहे. बर्फाळ प्रदेशातले लोक याकचं दूध पितात. याकच्या दुधापासून तयार करण्यात आलेलं पनीर आणि चीज लवकर खराब होत नाही.

खादाडी

### चमचमीत व्हेज टॅकोज



मुलामुलींनो, तुम्हाला छान चविष्ट पदार्थ खायला खूप आवडतात ना? तुम्ही मस्तपैकी व्हेज टॅकोज बनवून बघा. यासाठी चार टॅकोज, एक कप उकडलेला राजमा, दोन चमचे टोमॅटो प्युरी, मीठ, एक कांदा, दोन चमचे तेल, टोमॅटो आणि कोथिंबिर असं साहित्य घ्या. एका कढईत थोडं तेल गरम करा. यात कांदा, राजमा, मीठ, टोमॅटो प्युरी घालून मिक्स करा. मॅशरने हे मिश्रण मॅश करून घ्या. त्यानंतर त्यात थोडी साखर, हिरवी मिरची, चिली फ्लेक्स आणि कोथिंबिर घालून शिजवून घ्या. हे सगळं शिजवलेलं मिश्रण टॅकोजमध्ये घाला. वरून चिरलेला कांदा, टोमॅटो आणि कोथिंबिर घालून सजवा. मस्तपैकी खा.

स्टडी टिप्स

### नवे मित्रमैत्रिणी जोडा



मुलामुलींनो, तुम्ही वेगवेगळ्या शिकवणी वर्गांना जात असाल. शाळेत तुमचे मित्र-मैत्रिणी असतीलच. पण या क्लासमध्येही मुलामुलींशी बोला. त्यांच्याशी मैत्री करा. यामुळे एखादा मुद्दा समजला नाही तर तुम्ही त्यांच्याशी चर्चा करू शकता. काही कारणामुळे क्लास बुडवावा लागला तर तुम्ही त्यांच्याकडून नोट्स घेऊ शकता. परीक्षेच्या काळात एकत्र अभ्यास करू शकता. एकत्र अभ्यास केल्यामुळे विषय समजून घेणं सोपं होतं आणि हसत-खेळत छान अभ्यासही होतो.

योगा टाईम

### करा शलभासन

छोट्यांनो, आपलं शरीर लवचिक असायला हवं. शरीर लवचिक नसेल तर खेळताना, व्यायाम करताना त्रास होऊ शकतो. शरीर लवचिक बनवण्यासाठी तुम्ही शलभासन करू शकता. हे आसन खूप सोपं आहे. यामुळे शरीर लवचिक होतच शिवाय कंबरेचे स्नायू बळकट होतात. या आसनामुळे पचनशक्ती सुधारते. त्यामुळे हे आसन खूपच उपयुक्त ठरू शकतं.



# मनोरुग्णालयात मधमाश्यांचा कहर

## घारीने पोळे छेडताच अचानक हल्ला : ६० वर्षीय रूग्णाचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २१ :
नागपूरच्या प्रादेशिक मनोरुग्णालयात अचानक गोंधळ उडाला . रुग्ण जेवणाला बसलेले असतानाच मधमाश्यांच्या घोळक्याने परिसरात घुसून हल्ला केला.

रुग्णालयाच्या हिरवाईने वेढलेल्या ४० एकर जागेत एका उंच झाडावर मोठे पोळे असल्याचे सांगितले जाते. प्राथमिक माहितीनुसार, झाडाभोवती फिरणाऱ्या एका घारीने त्या पोळ्याला धक्का दिल्यामुळे मधमाश्या आक्रमक बनल्या आणि त्यांनी थेट रुग्णालयाच्या दोन वॉर्डांकडे धाव घेतली. मधमाश्यांनी केलेल्या या हल्ल्यामुळे अनेक रुग्ण भीतीने इकडे-तिकडे पळू लागले आणि काही जण गंभीररीत्या जखमी झाले.



या घटनेत ६० वर्षीय किसन नामक रुग्णाचा दुर्दैवी मृत्यू झाला असून ३९ रुग्ण तसेच दोन कर्मचारी जखमी झाल्याची माहिती वैद्यकीय अधीक्षक सतीश हुमणे यांनी दिली.

मधमाश्यांच्या दंशामुळे अचानक गोंधळ झाल्याने काही रुग्णांना घाबरून धक्कादायक अवस्था आली होती. जखमींना तातडीने रुग्णालयातील वेगळ्या विभागात हलवून उपचार करण्यात आले. रुग्णालय प्रशासनाने त्वरित परिसरातील सर्व कर्मचारी, नर्सिंग स्टाफ व सुरक्षारक्षकांना सतर्क केले. रुग्णालयाचा मोठा परिसर असल्याने आणि झाडांची दाटी असल्याने वन विभागाकडून आता या भागाचे सर्वेक्षण करण्यात येणार आहे.

# खून करीत पेटवून दिला मृतदेह

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २१ :
बांधकामाच्या एकाच साईटवर काम करणाऱ्या मजुराचा गळा दाबून खून केल्यानंतर पुरावा नष्ट करण्यासाठी मृतदेह पेटवून दिल्याची खळबळजनक घटना जयवंतनगर येथील सेंट्रल रेल्वे कॉलनी परिसरात उघडकीस आली.

धनसिंग धरमसिंग उईके (३०) छत्तरपूर घुगरी, मंडला (म. प्र.) असे मृतकाचे नाव असून गणेश धुर्वे (३०) आऊराई, कटंगी असे आरोपीचे नाव आहे.

जयवंतनगर येथील सेंट्रल रेल्वे कॉलनीत बांधकाम सुरू आहे. या बांधकामावर मृतक धनसिंग आणि आरोपी गणेश दोघेही कामाला होते. बांधकाम साईटवर काम करून ते तेथेच एका खोलीत दोघेही रहात होते. काल रात्री कसल्यातरी कारणावरून त्यांच्यात वाद झाला असता गणेशने गळा दाबून धनसिंगचा खून केला. पुरावा नष्ट करण्याच्या हेतूने त्याने मृतदेह पेटवून दिला. याप्रकरणी अजनी पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली होती. शवविच्छेदन अहवालात गळा दाबून धनसिंगचा मृत्यू झाल्याचा अहवाल डॉक्टरांनी दिला. त्याचप्रमाणे घटनास्थळावरील सीसी कॅमेऱ्याचे टेज तपासले असता रात्रीच्या वेळी गणेश हा लाईट बंद करून घाईघाईत पळताना दिसून आला. याप्रकरणी अजनी पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल करून आरोपीचा शोध सुरू केला आहे.

# सरकारविरोधात उद्रेक होणारच..

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २१ :
मालेगावमध्ये अल्पवयीन बालिकेवर झालेल्या अत्याचार व हत्या प्रकरणानंतर शहरात निर्माण झालेला संताप शिगेला पोहोचला आहे. काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी सरकारवर जोरदार टीका करीत हा जनतेचा उद्रेक आहे. आज तो गुन्हेगाराविरोधात आहे, पण उद्या हा उद्रेक थेट सरकारविरोधातही उसळू शकतो, असे ते म्हणाले.

महाराष्ट्र पोलिसांचा दरारा कमी होत चालला आहे, गुन्हेगारांमध्ये कायद्याची भीती राहिलेली नाही. न्याय मिळणार नाही अशी भावना लोकांच्या मनात निर्माण झाली आहे, याच अविश्वासातून उद्रेक दिसून आला, असे वडेट्टीवार यांनी म्हटले.

# पिकांचे नुकसान झाल्यास भरपाई

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २१ :
केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी मोठी घोषणा केली आहे. वन्यप्राण्यांकडून पिकांचे झालेले नुकसान आणि अतिवृष्टी व पुरामुळे भात पिकाचे झालेले नुकसान या दोन्ही प्रकारच्या नुकसानीसाठी आता पीक विमा नुकसान भरपाई मिळणार आहे. ही माहिती त्यांनी नागपूर येथे ॲग्रो व्हिजन कृषी प्रदर्शनाच्या उद्घाटनावेळी माध्यमांशी बोलताना दिली.

चौहान यांनी सांगितले की, २०२६ च्या खरीप हंगामापासून या दोन्ही नुकसानांसाठी पंतप्रधान पीक विमा योजनेअंतर्गत भरपाई दिली जाईल. यामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

हत्ती, रानडुक्कर, नीलगाय, हरीण आणि माकडे यांसारख्या वन्यप्राण्यांच्या हल्ल्यांमुळे भारतातील शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होते. विशेषतः जंगल, वन्यजीव मार्गिका आणि डोंगराळ प्रदेशांजवळील भागांमध्ये हे प्रकार अधिक दिसून येतात.

वन्यप्राण्यांच्या हल्ल्यामुळे होणारे पिकांचे नुकसान आता स्थानिक जोखीम श्रेणीअंतर्गत पाचवे ॲड-ऑन कव्हर म्हणून ओळखले जाईल. राज्य सरकारे पिकांच्या नुकसानीस जबाबदार असलेल्या वन्यप्राण्यांची यादी निश्चित करतील आणि आकडेवारीच्या आधारे संवेदनशील जिल्हे किंवा विमा युनिट्स ओळखतील. शेतकऱ्यांना पीक विमा ॲप वापरून जिओटॅग केलेले छायाचित्रे अपलोड करून तक्रार करणे बंधनकारक असेल, असेही चौहान यांनी स्पष्ट केले.

# दुग्धव्यवसायावर अधिक भर देण्याची गरज : ना. गडकरी

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २१ :
केंद्रीय भूपृष्ठ वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांनी विदर्भात गायींची संख्या झपाट्याने वाढवण्याचा नवीन फॉर्मुला शेतकऱ्यांना सांगितला.

शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवून या समस्येवर तोडगा शक्य आहे. सध्या पुणे, कोल्हापूरसह पश्चिम महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात दुधाचे उत्पादन ७० ते ९० लाख लिटरपर्यंत होते. परंतु विदभार्तील अकरा जिल्ह्यात मात्र दुधाचे उत्पादन केवळ २५ लाख लिटर आहे. या दुधाची उत्पादकता वाढवण्यासाठी पशु व मत्स विद्यापीठाकडून काम केले जात आहे.

भारतातील गिर जातीची गाय ब्राझीलमध्ये गेली होती. तिच्यावर प्रयोग करून आता ही गाय ६० लिटरपर्यंत दूध देत आहे. दुसरीकडे आता गायींना गोरीच जन्माला येईल असे तंत्रज्ञानही विकसीत झाले आहे. त्यामुळे या तंत्रज्ञानावर काम करण्याची गरज असल्याचे ते म्हणाले. शासन शेतकऱ्यांना २५ हजार गायी वाटणार आहे. कुक्कुट पालन, बकरी पालन सारखे गाय पालनावर काम करावे. जेणेकरून गायींची संख्या झपाट्याने वाढून शेतकऱ्यांना जोड व्यवसाय म्हणून दुधाचाही व्यवसाय करता येईल. त्यातून शेतकऱ्यांचे उत्पादन वाढणे शक्य असल्याचेही नितीन गडकरी यांनी सांगितले.

ॲग्रो व्हिजनद्वारे विदभार्तील शेतकऱ्यांना मोठा लाभ होत असून येथे विविध कार्यशाळेत शिकणाऱ्या नवनवीन तंत्रज्ञानाचा शेतकऱ्यांना लाभ होऊन त्यांच्या शेतीचे उत्पादन व उत्पन्न वाढत असल्याचेही गडकरी यांनी सांगितले.





## राज्य सरकारचे पूर्ण सहकार्य



शेतीत चांगले प्रयोग करावेत, चांगले वाण वापरावे, शेतीपूरक व्यवसाय करावेत आणि बदल करावा असा सल्ला राज्याचे कृषि मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिला. पेरणी ते कापणी पर्यंत राज्य सरकारचा शेती विभाग शेतकऱ्यांना सहकार्य करण्यास तत्पर आहे. कृषी संजीवनी सारख्या योजना राज्य राबवत असल्याचे त्यांनी सांगितले. ॲग्रोव्हिजन मधून मिळालेल्या सूचना आणि मार्गदर्शन यावर राज्यसरकार सकारात्मक विचार करेल असे आश्वासन त्यांनी दिले.

## बुटीबोरी मध्ये जनावरांच्या चारा प्रकल्पाचे भूमिपूजन

मराठवाडा आणि विदर्भाच्या १९ जिल्ह्यातील शेकऱ्यांकडून ६ लाख लीटर दूध संकलन एनडीडीबी द्वारे केले जाते अशी माहिती एनडीडीबीचे प्रमुख मिनेश शाह यांनी सांगितले. भारतात सध्या डेयरी उद्योगात परिवर्तन येत आहे. २०१६ मध्ये एनडीडीबीने विदर्भ क्षेत्रात कार्य सुरू केले, पुढील वर्षी याच मंचावर ६ लाख लीटर क्षमतेच्या प्रकल्पाचे उद्घाटन होईल असे आश्वासन त्यांनी दिले. याशिवाय आज बुटीबोरी मध्ये जनावरांच्या चाऱ्याचा प्रकल्पाचे भूमिपूजन आज झाले, तो देखील पुढील वर्षी पर्यन्त कार्यान्वित होईल असे ते म्हणाले.

## जिप्सी' सिनेमाच्या खास प्रदर्शनाला प्रेक्षकांचा हाऊसफुल्ल प्रतिसाद

लोकरंजन



वंचितांचं जगणं आणि त्यात आत्मजाणिवेनं होणारं परिवर्तन यांची हृदयस्पर्शी आणि तितकीच प्रेरणादायी कहाणी असलेल्या 'जिप्सी' या सिनेमाच्या खास प्रदर्शनाला प्रेक्षकांचा हाऊसफुल्ल प्रतिसाद लाभला.

महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्या दादासाहेब फाळके चित्रपट रसास्वाद मंडळातर्फे पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी येथे रविवारी दुपारी शशि खंदारे दिग्दर्शित जिप्सी सिनेमाचा खेळ आयोजित करण्यात आला होता.

यावेळी महामंडळाचे सह व्यवस्थापकीय संचालक प्रशांत साजणीकर, चित्रपटाचे दिग्दर्शक शशि खंदारे, राष्ट्रीय पुरस्कार विजेता बालकलाकार कबीर खंदारे यांच्यासह जिप्सी चित्रपटाची संपूर्ण टीम उपस्थित होती. चित्रपट प्रदर्शनानंतर चित्रपटातील कलाकारांची साजणीकर यांनी मुलाखत घेतली. चित्रपट निर्मितीच्या प्रवासातील गमतीदार किस्से आणि राष्ट्रीय पुरस्कारापर्यंतचा प्रवास आदी गोष्टी मुलाखतीतून उलगडण्यात आल्या.

महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली दादासाहेब फाळके चित्रपट रसास्वाद मंडळाची स्थापना करण्यात आली आहे. जुन्या चित्रपटांचे वैभव प्रेक्षकांना पुन्हा एकदा अनुभवता यावे आणि नव्या पिढीने तयार केलेले उत्तमोत्तम चित्रपट प्रेक्षकांपर्यंत पोहोचावेत हा या मंडळाचा उद्देश आहे. ■ ■ ■

## आली मोठी शहाणीच्या चित्रीकरणाचा श्रीगणेशा



काही दिवसांपूर्वी घोषित झालेल्या आली मोठी शहाणी या चित्रपटाने प्रेक्षकांची उत्सुकता चांगलीच वाढवली आहे. आता या चित्रपटाच्या गोव्यातील चित्रीकरणाचा श्रीगणेशा झाला असून, या निमित्ताने प्रेक्षकांसमोर एक नवी आणि हटके जोडी झळकणार आहे ती म्हणजे हृता दुर्गुळे आणि सारंग साठ्येची!

या दोघांची फ्रेश ऑनस्क्रीन केमिस्ट्री नेमकी कशी असणार, हे पाहाण्यासाठी प्रेक्षक आतुर आहेत. हृता तिच्या गोड आणि प्रभावी अभिनयासाठी ओळखली जाते, तर सारंगने नेहमीच वेगळ्या भूमिकांद्वारे प्रेक्षकांवर ठसा उमटवला आहे. त्यामुळे आली मोठी शहाणीत दोघांची जोडी नेमकी कोणत्या कथानकातून झळकणार, याबद्दलची उत्सुकता आहे.

चित्रपटाचं शीर्षक आली मोठी शहाणी जितकं आकर्षक, तितकंच ते कथानकाबद्दल कुतूहल निर्माण करणारं आहे. आता या हटके शीर्षकाखाली नेमकं काय घडणार आणि हृता-सारंगची जोडी प्रेक्षकांच्या मनात किती शहाणी ठरणार, हे पाहाणं उत्सुकतेचं ठरणार आहे!

दरम्यान, या चित्रपटाचं लेखन व दिग्दर्शन आनंद दिलीप गोखले यांनी केलं आहे. फाईन ब्रू प्रॉडक्शन्स प्रस्तुत आणि टू होप फिल्म वर्क्सच्या सहयोगाने प्रेक्षकांच्या भेटीला येणाऱ्या या चित्रपटाचे निर्माते जयकुमार मुनोत, ईशा मूठे आणि श्रुती साठे आहेत. ■ ■ ■

## न्यू नॅशनल क्रश अलर्ट -अभिनेत्री गिरिजा ओक

ट्विटर वर ट्रेंड होणारी ही अभिनेत्री गिरिजा ओक असून ट्विटर वर सर्वाधिक चर्चेत असलेलं हे नाव आहे.
मालिका, चित्रपट, नाटक, ओटीटी वरून प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य केलेली अभिनेत्री गिरिजा ओक ही न्यू नॅशनल क्रश होताना दिसतेय. इंटरनेटवर कोणीही एका रात्रीत सेन्सेशन बनू शकते आणि आता निळ्या साडीतील एक महिला चर्चेत आहे. अनेक लोक ती कोण आहे हे जाणून घेण्यास उत्सुक होते आणि खरं तर अनेक यूजर्सनी हा फोटो पोस्ट केला आणि ती कोण आहे आणि ती का ट्रेंड करत आहे असे विचारले. त्यानंतर यूजर्सनी सोशल मीडिया वर चौकशी सुरू केली. तेव्हा कळले की ती दुसरी तिसरी कोणतीही अभिनेत्री नसून गिरिजा ओक आहे.
मराठी, हिंदी आणि कन्नड चित्रपटांमध्ये देखील गिरिजा ने आजवर काम केल आहे. गिरिजाचा निळ्या रंगाच्या साडी मधला फोटो इंटरनेट तुफान व्हायरल होतोय आणि प्रेक्षक फॅन्स यांनी ती न्यू नॅशनल क्रश आहे असं देखील जाहीरपणे सांगितलं आहे. तिच्या सोशल मीडिया वरच्या फोटोजने तिने प्रेक्षकांचं कायम लक्ष वेधून घेतलं आहे तिने आजवर अनेक दर्जेदार प्रोजेक्ट्स मध्ये काम सुद्धा केलं आहे. येणाऱ्या काळात गिरिजा नक्कीच काहीतरी खास घेऊन येणार यात शंका नाही. ■ ■ ■



## २८ नोव्हेंबरला प्रदर्शित होणार
## असा मी अशी मी




जागतिक पातळीवर मराठी सिनेमाची छाप उमटवण्याचा निर्धार केलेल्या निर्माते सचिन नाहर आणि अमोग मलाविया यांनी प्रेक्षकांसाठी एक हटके प्रोजेक्ट साकारला आहे. यूकेमध्ये शूट झालेला नवा मराठी चित्रपट असा मी अशी मी हा त्यांच्या कल्पकतेचा आणि मेहनतीचा उल्लेखनीय नमुना आहे.

या सिनेमाचे पोस्टर नुकताच रिलीझ झाला. पोस्टरवरील कलाकार तेजश्री प्रधान आणि अजिंक्य रमेश देव यांचा डॅशिंग लूक प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतो. या न्यू -एज प्रेमकथेची कथा नेमकी काय असेल याविषयी आता प्रेक्षकांमध्ये प्रचंड उत्सुकता वाढली आहे. विशेष म्हणजे हा सिनेमा येत्या २८ नोव्हेंबर रोजी प्रदर्शित होत आहे.

चित्रपटाचे दिग्दर्शन अमोल शेटगे यांनी केले असून, मुख्य भूमिकेत अजिंक्य रमेश देव, प्रेक्षकप्रिय अभिनेत्री तेजश्री प्रधान, तसेच इतर भारतीय आणि ब्रिटिश कलाकारांची प्रभावी फळी दिसेल. या कलाकारांमुळे चित्रपटाला एक सुंदर आंतरराष्ट्रीय रंग प्राप्त झाला आहे.यूकेच्या देखण्या लोकेशन्समध्ये विणलेली ही हळुवार प्रेमकहाणी आधुनिक नातेसंबंधांना भावनिक अंगाने मांडते. जे नक्कीच प्रेक्षकांना थिएटरमध्ये एक ताजेतवाने अनुभव देईल. ■ ■ ■

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

## आचार्य रत्नसुंदरसूरिश्वर महाराजांच्या ५०० व्या ग्रंथाचे जानेवारीत प्रकाशन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २१ :



गुजरातची आध्यात्मिक परंपरा आणि भारतीय संस्कृतीचा तेजस्वी वारसा, पद्मभूषण गौरवाने अलंकृत, परम पूज्य आचार्य रत्नसुंदरसूरिश्वर महाराज यांच्या ५०० वा ग्रंथ प्रेमनु विश्व, विश्वनो प्रेम (प्रेमाचे विश्व, विश्वाचे प्रेम) च्या प्रकाशनाच्या निमित्ताने एक भव्य ऊर्जा महोत्सव आयोजित करण्यात आला आहे.

७ ते १२ जानेवारी २०२६ दरम्यान रिचर्ड्स अँड क्रुड्डास जम्बो फॅसिलिटी सेंटर, मुलुंड, मुंबई येथे महोत्सव होणार आहे. ग्रंथाचे प्रकाशन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ११ जानेवारी रोजी होईल. पंतप्रधानांची उपस्थिती आचार्यश्रींच्या जागतिक प्रभाव आणि आध्यात्मिक तेजाचे प्रतीक आहे.

**जगप्रसिद्ध प्रवचनकार आणि युवा परिवर्तनाचे प्रेरणास्थान :** वर्धमान तपोनिधी, परम पूज्य गुरुदेव भुवनभानुसूरिश्वर महाराज यांच्या आशीर्वादाने आचार्य गेल्या ५० वर्षांहून अधिक काळापासून आपल्या प्रवचनांच्या माध्यमातून समाजाला जागृत करत आहेत. ते एक प्रभावशाली आणि जगप्रसिद्ध वक्ते आहेत, ज्यांच्या विचारांनी लाखो युवकांच्या जीवनात परिवर्तन घडवले आहे. त्यांच्या प्रेरणेतून अनेक तरुणांनी नैतिकता, संस्कार आणि सकारात्मक जीवनशैली अंगीकारली असून, व्यसनमुक्त आणि आशावादी जीवन जगण्याचा मार्ग स्वीकारला आहे.

आचार्यांनी फक्त प्रवचनांनीच नव्हे तर लेखनाद्वारेही समाजाला मार्गदर्शन केले आहे. फॅमिली, स्ट्रेस मॅनेजमेंट, पॉझिटिव्हिटी, आणि ह्युमॅनिटी अशा ८० पेक्षा अधिक संवेदनशील विषयांवर त्यांनी गुजराती भाषेत ५०० पुस्तके लिहून एक अप्रतिम कीर्तिमान प्रस्थापित केले आहे.

## निर्मल को-ऑप. मध्ये कोट्यवधींचा घोटाळा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २१ :
नागपुरच्या निर्मल को-ऑपरेटिव सोसायटीमध्ये कोट्यवधींच्या वित्तीय गडबडीचा गंभीर प्रकार समोर आला असून, मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने या प्रकरणाची तपासणी सीबीआयकडे सोपवण्याचा मोठा निर्णय दिला आहे. न्यायमूर्ती अनिल पानसरे आणि राज वाकोड़े यांच्या खंडपीठाने म्हटले आहे की, सोसायटीशी निगडित जमाकर्त्यांचे हित सर्वोपरि आहे आणि त्यामुळे निष्पक्ष तपासणे अनिवार्य आहे.

निर्मल को-ऑपरेटिव सोसायटीची महाप्रबंधक नंदा बांते यांनी राज्य सरकार आणि पोलिसांवर राजकीय दबावाखाली अनावश्यक कारवाई केल्याचा आरोप करत हायकोर्टात याचिका दाखल केली होती. आधीच्या तपासणीत कुठलाही गैरव्यवहार सापडला नाही, तरीही पोलिसांनी सतत दस्तऐवज मागवून दबाव वाढवला, असे त्यांनी सांगितले होते.

याचिकेत पोलिस आयुक्तांनी २९ जून २०२३ रोजी दिलेल्या त्या आदेशाला रद्द करण्याची मागणी होती, ज्यात को-ऑपरेटिव सोसायटीवर कोट्यवधींच्या अनियमिततेचा उल्लेख करून एमपीआयडी कायदा, भारतीय दंड संहिता आणि मल्टी-स्टेट को-ऑपरेटिव सोसायटी एक्ट २००२ अंतर्गत कारवाईचा सल्ला दिला होता.

मागील सुनावणीत कोर्टाला समजले की सोसायटी आर्थिकदृष्ट्या सावरली आहे आणि जर त्वरित उपाययोजना झाली नाही तर हजारो जमाकर्त्यांचे पैसे बुडण्याची भीती आहे. पोलिस आयुक्तांच्या अहवालानुसार सोसायटीत कोट्यवधींचा गैरव्यवहार झाल्याचा संशय असूनही पोलिसांनी गंभीर कारवाई केली नाही.

केंद्रीय सहकारी सोसायटी रजिस्ट्रारच्या शपथपत्रात एफआयआर नोंदविण्यास कोणतीही परवानगी आवश्यक नसल्याचे नमूद असताना पोलिसांनी कारवाई न करण्यावर कोर्टाने गंभीर प्रश्न उपस्थित केला.कोटार्ने म्हटले,कायद्यात परवानगीची अडचण नाही तर कारवाई का नाही?

दरम्यान, सुनावणीत, हायकोर्टाने प्रकरण गंभीर असल्यामुळे सीबीआयला त्वरित एफआयआर नोंदवून पारदर्शक आणि निष्पक्ष तपास करण्याचे निर्देश दिले. तसेच, सोसायटीत प्रशासक नियुक्तीची मागणी खारिज करत योग्य न्यायालयात हा प्रश्न मांडण्याचा सल्ला दिला.

दरम्यान निर्मल को-ऑपरेटिव सोसायटीतील आर्थिक घोटाळ्यांनी सहकारी संस्थांच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे. हायकोर्टाच्या कडक टीका आणि सीबीआय तपासण्याचा आदेश या प्रकरणाची गंभीरता अधोरेखित करतो. आता हजारो जमाकर्त्यांची नजर सीबीआयच्या पुढील कारवाईकडे लागली आहे.

# हिवाळी अधिवेशनाची कामे पुन्हा बंद

## कंत्राटदार संघटनेचा कामबंद आंदोलनाचा इशारा

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २१ :
नागपुरातील हिवाळी अधिवेशनाला काही दिवस शिल्लक असतानाच कंत्राटदार संघटनेने कामबंद आंदोलन करण्याचा निर्णय घेतला आहे. यामागे मुख्य कारण थकीत १५० कोटी रुपयांचा निधी अजूनही कंत्राटदारांना दिला न जाणे आहे.

नागपुरातील विविध विकास कामांवर कार्यरत असलेल्या कंत्राटदारांनी यापूर्वी फक्त २० टक्के निधी मिळाल्याचे जाहीर केले असून, तरीही हा निधी पुरेसा नसल्याने ते समाधानी नाहीत. त्यांच्या मागण्यांकडे प्रशासन आणि स्थानिक सत्ता दुर्लक्ष करत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

हिवाळी अधिवेशन ८ डिसेंबरपासून सुरू होणार असून, कंत्राटदारांनी अधिवेशनाच्या आधीच कामे थांबवण्याचा निर्णय घेतल्यामुळे नागपुरातील विकास कामांवर मोठा परिणाम होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. कंत्राटदार संघटनेच्या या आंदोलनामुळे प्रशासनात तणाव वाढत असून, या वादाचे लवकरात लवकर समाधान शोधण्यासाठी सरकारी तऱ्हेने पुढाकार घेण्याची मागणी करण्यात येत आहे. कंत्राटदारांच्या कामबंद आंदोलनाचा मोठा फटका बसणार आहे.

